**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.४४४/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अजयकुमार बलदेव जगताणी<br>१०९, काकावाडी, महिला आश्रम, वर्धा<br>ता. जि. वर्धा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>महिला सेवा मंडळ, वर्धा<br>महिला आश्रम, सेवाग्राम रोड, वर्धा-४४२ ००१ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>महिला सेवा मंडळ, वर्धा<br>महिला आश्रम, सेवाग्राम रोड, वर्धा-४४२ ००१ | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०१/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०२/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांच्या तर्फे सहसचिव, महिला सेवा मंडळ वर्धा श्री पवन श्रीनिवास रुईया आणि ॲड. श्री शंतनु भोयर हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. १४/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी, महिला सेवा मंडळ वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन महिला सेवा मंडळ वर्धा या संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थेच्या संदर्भात १ ते ८ मुद्यांवर माहिती मागितली होती. तथापी त्यांना

जनमाहिती अधिकारी यांनी दि. १२/०२/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, आमची ट्रस्ट माहिती अधिकाराच्या कार्यकक्षेत येत नसल्यामुळे माहिती देता येत नाही. तथापी अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की, महिला सेवा मंडळ या संस्थेमार्फत १) महिला आश्रम ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन वर्धा २) रत्नीबाई विद्यालय वर्धा, ३) हिंमतसिंगका विद्यालय वर्धा, ४) हिंमतसिंगका ज्युनिअर कॉलेज ऑफ वर्धा ४) महिला आश्रम प्रायमरी (मराठी) स्कुल वर्धा, ५) महिला आश्रम प्रायमरी (हिंदी) स्कुल वर्धा इ. शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. या शैक्षणिक संस्थांना वेतन व इतर बार्बीसाठी शासनाकडून अनुदान प्राप्त होत असते त्यामुळे सदरच्या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होतात म्हणून त्यांना माहिती मिळणे आवश्यक आहे असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरिता जनमाहिती अधिकारी यांचे वतीने आणि महिला सेवा मंडळ वर्धा यांचे वतीने ॲड. शंतनू भोयर हे उपस्थित आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरची संस्था ही Bombay Public Trusts Act and Societies Act यांचे अंतर्गत नोंदणीकृत झालेली असल्यामुळे सदर संस्थेस कोणत्याही प्रकारचे शासनाचे अनुदान प्राप्त होत नाही. सदर संस्थेस शासनाचे अनुदान उपलब्ध होत नसून त्यांच्याकडून कार्यरत असलेल्या शैक्षणिक संस्थांना शासनाकडून वेतनासाठी अनुदान प्राप्त होत असल्याचे ॲड भोयर यांनी सांगितले. म्हणून महिला सेवा मंडळ वर्धा या ट्रस्टला शासनाचे प्रत्यक्ष अनुदान प्राप्त होत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी या ट्रस्टला लागू होत नाही असे ॲड भोयर यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे वतीने हजर असलेले ॲड भोयर यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, महिला सेवा मंडळ या संस्थेमार्फत वर नमुद केल्याप्रमाणे शैक्षणिक संस्था चालविल्या जात आहेत. आणि त्या शैक्षणिक संस्थांना वेतन व इतर बाबींसाठी शासनाकडून अनुदान प्राप्त होत असते. महिला सेवा मंडळ वर्धा यांचे उत्पन्न व खर्चाचे स्टेटमेंट पाहिले असता त्यामध्ये वेतन अनुदान आणि वेतनेत्तर अनुदान प्राप्त झाल्याचे दिसून येते.

तसेच मा. उच्च न्यायालय खंडपीठ  नागपूर यांचेकडील रिट पिटीशन क्र. ४०४८/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी दि.२२/०४/२०११ रोजी असा निर्णय दिला आहे की, ज्या संस्थांच्या शाळांना शासकीय अनुदान प्राप्त होते त्या संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होतात असा निर्णय दिलेला आहे. म्हणून मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांच्या  या निर्णयाप्रमाणे माहितीचा अधिकार कायदा हा महिला सेवा मंडळ वर्धा यांना लागू होतो म्हणून अपीलार्थीचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांचे दि. १४/०१/२०११ च्या माहिती अर्जातील सर्व माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.४४६/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राधेश्याम परसरामजी काबरा<br>मु. पो. देसाईगंज<br>ता. देसाईगंज जि. गडचिरोली-४४१ २०७ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>देसाईगंज<br>ता. देसाईगंज जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय देसाईगंज<br>ता. देसाईगंज जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०१/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०२/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार देसाईगंज जि. गडचिरोली श्री गोहने हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी देसाईगंज जि. गडचिरोली श्री सोनवणे हे हजर आहेत.

२. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार देसाईगंज श्री गोहणे हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी देसाईगंज श्री सोनवणे हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार श्री गोहणे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२४/०९/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने सदर अर्जात मौजा विर्शी तुकुम येथील जुने सर्व्हे नं.२८८/१ नवीन सर्व्हे नं. ३५६ चे अनुषंगाने तसेच दाखल केलेले सहपत्र १ ते १० च्या संबंधाने व इतर बाबींविषयी १ ते १३ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपीलार्थीने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि दि. २०/१०/२०१० च्या पत्रान्वये आणि दि.०६/१२/२०१० च्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. अपीलार्थीस सदरची माहिती प्राप्त झाल्याची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविली. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. आणि अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेऊन अपीलकर्त्यास तहसिलदार देसाईगंज यांनी दि.२०/१०/२०१० आणि दि.०६/१२/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे नमुद करुन सदर अपील फेटाळण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी श्री सोनवाने यांनी आयोगापुढे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी दि. २०/१०/२०१० आणि दि. ०६/१२/२०१० च्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस पुरविलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.४४५/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अनंतकुमार टेटे<br>मु. पो. गोवर्धन नगर, तुमसर<br>ता. तुमसर जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक<br>सहकारी पत संस्था भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर<br>ता. तुमसर जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०१/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०२/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती यांचे तर्फे लिपीक श्री रविकांत सिताराम अवथरे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था भंडारा यांचे तर्फे श्री हटवार सहायक निबंधक, सहकारी संस्था हे हजर आहेत.

२.   अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. २६/१०/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने दि. ०५/१०/२०१० ला ओपन ओटा, व्यापारी दुकान गाळे, हमाल दुकान गाळे  या कामाची निविदा कोणत्या दैनिक वृत्तपत्रात (राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्तरीय किंवा स्थानिक) प्रकाशित करण्यात आली त्या निविदेची प्रत, सदर कामाकरिता किती निविदा फॉर्म विक्री करण्यात आले व किती निविदा सादर करण्यात आल्या ? कोणत्या ऐजेन्सीची निविदा मंजूर करण्यात आली ? मंजूर निविदेची प्रत देण्यात यावी. सदर कामाची निविदा किती टक्के कमी/जास्त दराने मंजूर करण्यात आली ? सदर कामाच्या मंजूर अंदाजपत्रकाची प्रत देण्यात यावी. याप्रकारची माहिती मागितली होती. अपीलार्थीने मागितलेली माहिती काढण्यात आली. आणि अपीलार्थीस दि. ०४/१२/२०१० च्या पत्रान्वये  आवश्यक ती माहिती पाठविण्यात आली. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था भंडारा यांचेकडे दाखल केले. सदर प्रथम अपीलाचा निर्णय दि.१२/०१/२०११ रोजी देण्यात आला. आणि प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन देखील अपीलार्थीस पुन्हा दि.१७/०१/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले.

३.   जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०४/१२/२०१० च्या पत्रान्वये आणि दि.१७/०१/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलार्थीचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१.	अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.४५१/नाग/२०११</u>**

१. श्री नंदु गणपतराव कन्हेर - **अपीलकर्ता**
प्लॉट नं. १, गेडाम ले-आऊट, एम.आय.डी.सी. हिंगणा रोड, नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी - **उत्तरवादी**
पंचायत समिती हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव - **उत्तरवादी**
ग्राम पंचायत निलडोह
ता. हिंगणा जि. नागपूर

## (आदेश पारित दिनांक ०२/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०२/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत निलडोह ता. हिंगणा जि. नागपूर श्री शामराव भिसे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी पंचायत समिती हिंगणा श्री एस.पी. सानप, विस्तार अधिकारी हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. १४/१०/२०१० रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्राम पंचायत निलडोह ता. हिंगणा जि. नागपूर यांचेकडे दि.०१/०४/२००९ ते दि.३१/०३/२०१० पर्यंत कोणत्या वार्डात व कुणाच्या घराजवळ किती मुरुम टाकला. त्या टाकलेल्या मुरुमाची रॉयल्टी व बीलांबाबतची माहिती मागितलेली होती. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले होते. त्यानुसार त्यांनी माहितीचे शुल्क भरले आणि माहिती त्यांना प्राप्त झाली. मात्र उपलब्ध झालेली  माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील विस्तार अधिकारी, पंचायत समिती हिंगणा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. आणि त्यामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असा निर्णय दिला की, जनमाहिती अधिकारी यांनी ज्या ठिकाणी मुरुम टाकला आहे त्याची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. आणि माहितीचे ज्यादा घेतलेले शुल्क अपीलार्थीस परत करावे असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिला. मात्र त्यांच्याकडून घेतलेले ज्यादा शुल्क परत मिळाले नाही आणि मुरुमाबाबतची माहिती देखील मिळाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत निलडोह श्री भिसे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१४/१०/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलार्थीस दि. १२/११/२०१० च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार अपीलार्थीने माहितीच्या शुल्काचा भरणा केला आणि त्यानंतर दि.२४/११/२०१० च्या पत्रान्वये त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस दिली. सदर माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र मुरुम हा कोणत्या ठिकाणी टाकलेला आहे याची माहिती आणि रॉयलटीची माहिती त्यांना मिळाली नाही. तसेच ज्यादा भरलेले माहितीचे शुल्क त्यांना परत करण्यात आले नाही असेही त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४.	प्रथम अपीलीय अधिकारी श्री सानप  यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांच्याकडे  दाखल झाल्यानंतर त्याची सुनावणी घेण्यात आली आणि दि. २१/०२/२०११ रोजी निर्णय देण्यात आला. आणि त्यामध्ये अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी मुरुम ज्या ठिकाणी टाकला त्याची माहिती देण्याचे

आदेश दिले. तसेच माहितीचे ज्यादा घेतलेले शुल्क परत करण्याचे आदेश दिले आहेत असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. २४/११/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे मात्र अपीलार्थीस मुरुम टाकल्याबाबतची जी बीले दिलेली आहेत तो टाकलेला मुरुम कोणत्या वार्डात आणि कोणाच्या घराजवळ टाकला आहे याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तथापी ज्या बीलांवर ठिकाणाचा उल्लेख नसेल तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिलेल्या प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलार्थीकडून ज्यादा घेतलेल्या माहितीचे शोधन शुल्क परत करणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी ज्या ठिकाणी मुरुम टाकलेला आहे त्याबाबतची माहिती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच रॉयल्टीच्या संदर्भातील माहिती कळवावी. त्याचप्रमाणे घेतलेले ज्यादा शुल्क अपीलकर्त्यास त्वरीत परत करावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर** (पी डब्ल्यू पाटील)

**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.४५४/नाग/२०११</u>**

१. श्री चंद्रहास सदाशिव राऊत - **अपीलकर्ता**
१८७, दत्तनिवास अपार्टमेंट, दत्तात्रय नगर, नागपूर
ता. जि. नागपूर-२४

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या. नागपूर
गड्डीगोदाम, नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. महाल विभाग, नागपूर
ता. जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक ०२/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १७/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०२/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या. महाल विभाग नागपूर श्री एस. पी. वाघमारे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या. नागपूर श्री पी रेशमे हजर आहेत.

२.	आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी महाल श्री एस. पी. वाघमारे हे हजर आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. १९/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती कार्यकारी अभियंता (प्रशासन) सदर नागपूर यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती प्राप्त होण्यास विलंब झाला म्हणून अपीलार्थीस ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील अधिक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.०८/०२/२०११ रोजी देण्यात आला आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की, अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती कार्यकारी अभियंता प्रशासन यांनी त्वरीत कार्यकारी अभियंता, महाल यांचेकडे अपीलार्थीस देण्यासाठी पाठवावी. म्हणून प्रथम अपीलाच्या या निर्णयानंतर कार्यकारी अभियंता प्रशासन यांचेकडून सदरची माहिती दि. २१/०२/२०११ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, महाल विभाग यांचेकडे प्राप्त झाली. त्यानंतर कार्यकारी अभियंता, महाल यांनी अपीलार्थीस दि. २५/०२/२०११ च्या पत्रान्वये सदरची माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली. परंतू सदरचे रजिस्टर्ड पत्र परत आले. परत आलेले रजिस्टर्ड पत्र त्यांनी आयोगासमोर दाखविले म्हणून अपीलार्थीस दि. १६/०६/२०११ च्या पत्रान्वये सदरची माहिती रजिस्टर्ड पत्राने पुन्हा पाठविण्यात आली. आणि ती माहिती अपीलार्थीस दि. २३/०६/२०११ रोजी प्राप्त झाल्याची पोच कार्यकारी अभियंता यांनी आयोगापुढे दाखविली.

३.	जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री वाघमारे आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, श्री रेशमे यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीच्या दि.१९/११/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री वाघमारे यांनी अपीलार्थीस प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर दि. २५/०२/२०११ रोजी पोस्टामार्फत नोंदणीकृत पत्राद्वारे माहिती पाठविलेली आहे. परंतू सदचे नोंदणीकृत पत्र परत आले म्हणून पुन्हा अपीलार्थीस दि. १६/०६/२०११ च्या पत्रान्वये नोंदणीकृत डाकेने माहिती पाठविली आणि ती माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे दिसून येते. परंतू कार्यकारी अभियंता श्री वाघमारे यांनी अपीलार्थीस ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही

आणि सदरची माहिती दि.२५/०२/२०११ च्या पत्रान्वये पाठविलेली दिसते म्हणजेच सदरची माहिती विलंबाने पाठविल्याचे दिसून येते. सदर विलंबाबाबत त्यांना खुलासा विचारला असता श्री वाघमारे यांनी असे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेली माहिती ही कार्यकारी अभियंता, प्रशासन यांचेकडून उशिरा प्राप्त झाल्यामुळे माहिती देण्यास विलंब झालेला आहे. मात्र जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री वाघमारे यांनी कार्यकारी अभियंता प्रशासन यांचेकडून ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी त्यांना कोणतेही लेखी पत्र दिलेले नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयातील सुचनानुसार कार्यकारी अभियंता, प्रशासन यांनी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री वाघमारे यांचेकडे माहिती पाठविलेली आहे. म्हणून सदरच्या विलंबास जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री वाघमारे हे जबाबदार दिसून येतात. तसेच विलंबाबद्यल त्यांनी केलेला खुलासा देखील मान्य करण्यासारखा नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री एस. पी. वाघमारे यांनी अपीलार्थीच्या दि.१९/११/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जातील माहिती दि.२५/०२/२०११ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू सदरची माहिती ३० दिवसांचे मुदतीत दिलेली नाही म्हणून अपीलार्थीस विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिल्याबद्यल श्री वाघमारे हे जबाबदार दिसून येतात म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

३. सदरच्या निर्णयाची एक प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत विरतण कं. गड्डीगोदाम नागपूर यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

P.T.O.

४.        अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.४६१/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अर्जुन मोना कोटांगले<br>विहीरगांव (कन्हाळया) पो. भूगाव (मेंढा)<br>ता. लाखनी जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक<br>भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा पोलीस पाटील/नियंत्रक<br>महात्मा गांधी तंटामुक्त गांव समिती, विहीरगांव (कन्हाळया) पो. भुगांव (मेंढा)<br>ता. लाखनी जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०४/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०४/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा पोलीस पाटील नियंत्रक, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती विहीरगांव (कन्हाळा) भुगांव ता. लाखनी जि. भंडारा श्री प्रल्हाद कोचे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक भंडारा तर्फे श्री बी. एस. महाजन पोलीस उप अधिक्षक (गृह) भंडारा हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दि.१६/११/२०१० रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन जनमाहिती अधिकारी तथा नियंत्रक/ पोलीस पाटील आणि अध्यक्ष, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती विहीरगाव (कन्हाळया) पो. भुगाव (मेंढा) ता. लाखनी जि. भंडारा यांचेकडे अर्जदाराने दिलेल्या दिनांक १५/१०/२०१० च्या अर्जानुसार तंटामुक्त गाव समितीने केलेली कार्यवाहीच्या वृतांताबाबतची माहिती मागितलेली आहे.

३.	आज आयोगापुढे सुनावणीस अपीलार्थी गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा पोलीस पाटील श्री प्रल्हाद कोचे हे उपस्थित आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. १६/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२३/११/२०१० रोजी रजिस्टर्ड पोस्टाने प्राप्त झाला होता. अपीलार्थीने दि.१५/१०/२०१० च्या अर्जानुसार तंटामुक्त गाव समितीने केलेल्या कार्यवाहीचा वृतांत तसेच सर्व सभासदांच्या उपस्थितीत दिलेल्या निकालाची कार्यालयीन प्रत आणि गैर अर्जदार श्री नाना जांभुळकर यांनी तंटामुक्त समितीकडे दिलेल्या करारनाम्याची प्रत इ. माहिती मागितली होती. अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दि. २९/११/२०१० रोजी पोस्टाने पाठविली. परंतू त्यावेळी त्यांच्याकडे गैरअर्जदार श्री जांभुळकर यांच्या करारनाम्याची प्रत उपलब्ध नव्हती परंतू त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील पोलीस अधिक्षक भंडारा यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. ०७/०१/२०११ रोजी घेण्यात आली आणि त्यावेळी अपीलार्थीस एका प्रती मध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलीय अधिकारी यांचे समक्ष माहिती उपलब्ध करुन दिली असे श्री बी. एस. महाजन यांनी सांगितले. त्याचप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी गैरअर्जदार श्री जांभुळकर यांचेकडून करारनाम्याची प्रत प्राप्त करुन घेतली आणि सदर करारनाम्याची प्रत अपीलार्थीस दि. १२/०३/२०११ ला नोंदणीकृत डाकेने उपलब्ध करुन दिली असून अपीलार्थीस प्राप्त झाल्याची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविली.

४.	जनमाहिती अधिकारी तथा पोलीस पाटील आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले पोलीस उपअधिक्षक श्री बी. एस. महाजन यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी

अपीलार्थीस दि. २९/११/२०१० च्या पत्रान्वये आणि दि.१२/०३/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक असलेली माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.४६२/नाग/२०११</u>**

१. श्री गिरजाशंकर शिवविलास चौधरी - **अपीलकर्ता**
प्लॉट नं. ३०, गेडाम ले-आऊट, भामटी, नागपूर
ता. जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव (विकास) - **उत्तरवादी**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
ता. जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
ता. जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक ०४/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०४/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी श्री हरीश डायाभाई ठक्कर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप कुलसचिव (विकास) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ हे निवडणूक कामात व्यस्त असल्याचे त्यांनी कळविले आहे.

२. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. १२/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी रा.स.तु.म. विद्यापीठ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकराखाली अर्ज सादर करुन त्यांनी दि.१३/०७/२०१० रोजी कुलसचिव यांचेकडे सौ रंजना अभय ठाकरे लायब्रेरियन अस्टिटंट आणि अभियांत्रिकी विभागातील इंजिनियर श्री एम. जी. पाटील हे दोघे मिळून त्यांना फसविण्याचा प्रयत्न करित आहेत अशी तक्रार केली होती. त्यावर कार्यवाही करावी असे अपीलार्थीने माहिती अर्जात मागणी केली होती.

३. जनमाहिती अधिकारी श्री हरिश जायाभाई  ठक्कर विद्यापीठ अभियंता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सौ. रंजना अभय ठाकरे आणि अपीलकर्ता यांचे आपसातील तक्रारींमुळे कोर्टात केस सुरु असून हे प्रकरण व्यक्तीगत स्वरुपाचे आहे. म्हणून त्या तक्रारीचा या विभागाशी काहीही संबंध येत नाही अशी माहिती अपीलार्थीस दि. १७/०१/२०११ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, सौ रंजना अभय ठाकरे व अपीलकर्ता यांचे वैयक्तिक वाद असून त्याबाबतची कोर्टात केस सुरु असल्याचे दिसून येते. म्हणून वैयक्तिक बाबींचा संबंध विद्यापीठाशी दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्याने खाजगी वादाबाबत किंवा वैयक्तिक वादाबाबत योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यात येते.

# आ दे श

१.  अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२.  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.४७९/नाग/२०११**

१. श्री सुरेशकुमार रामप्रसादजी शुक्ला - **अपीलकर्ता**
भाऊआ-कुटी,राष्ट्रसंत वार्ड, आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा - ४४२ २०१

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा

३. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा

**(आदेश पारित दिनांक ०६/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०६/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार आर्वी श्री अजय चरडे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार आर्वी श्री जी. एन. करलुके हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २३/०९/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार तहसिल कार्यालय आर्वी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन निळे केरोसीन

परवानाधारक श्रीमती सरस्वतीबाई राजकुमार वधवा यांचे विरुध्द दि.२३/०२/२००४ ला दिलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची तसेच दि. ०१/०४/२००९ ते दि. ३१/०३/२०१० पर्यंत किती केरोसीन उचल करण्यात आले किती लाभार्थ्यांना ते विक्री करण्यात आले, तसेच हनुमान वार्डातील कार्डधारकांची घरगुती गॅस असल्या/ नसल्याबाबत व तसेच साठापंजी, वितरण पंजी, बिलबुक व किती ग्राहकांनी तेल उचल केली किती रक्कम दिली त्याचप्रमाणे शिल्लक मालाची रॉकेलच्या स्टॉक रजिस्टरची आणि वितरण केलेल्या रॉकेलच्या बीलबुकाच्या प्रतींची माहिती मागितली होती. परंतू त्यांना विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील तहसिलदार आर्वी यांचेकडे दाखल केले. मात्र तहसिलदार आर्वी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. म्हणून अपीलाकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. तसेच त्यांना विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी असे अपीलार्थीने सांगितले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरिता विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार आर्वी श्री अजय चरडे हे उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार आर्वी श्री जे. एन. करलुके हे हजर आहेत. विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री अजय चरडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. २३/०९/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्यावेळी तात्कालीन जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार म्हणून श्री ए. एम. धरमपुरियॉं हे कार्यरत होते. तथापी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या दि.२३/०९/२०१० च्या माहिती अर्जावर केलेल्या कार्यवाही संदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध नाही म्हणून ३० दिवसांचे मुदतीत अपीलार्थीस कोणतीही माहिती त्यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील तहसिलदार यांचेकडे दि. २५/१०/२०१० रोजी दाखल केले. त्यावेळी तात्कालीन तहसिलदार म्हणून श्री राहुल सारंग हे कार्यरत होते. त्यांच्याकडून प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित केलेला दिसत नाही असे विद्यमान तहसिलदार श्री करलुके यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलार्थीने सुनावीणीत असेही सांगितले की, त्यांना विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.०५/०७/२०११ ला दि.०१/०४/२००९ ते ३१/०३/२०१० पर्यंतची केरोसीन उचल बाबतची माहिती प्राप्त झाली

आणि साठापंजीची माहिती प्राप्त झाली मात्र इतर माहिती त्यांना प्राप्त झाली नाही. त्यावर विद्यमान जनमाहिती अधिकारी आणि विद्यमान तहसिलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलार्थीस ७ दिवसांचे आत इतर मुद्यांची माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि. २३/०९/२०१० च्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन ३० दिवसांचे मुदतीत तात्कालीन जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी अपीलकर्त्यास कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली दिसून येत नाही. म्हणून अपीलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यास तात्कालीन जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार हे जबाबदार दिसून येतात. तसेच तात्कालीन तहसिलदार यांनी देखील अपीलकर्त्याच्या प्रथम अपीलानंतर कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येत नाही म्हणून अपीलार्थीचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी अपीलार्थीस दि.२३/०९/२०१० च्या माहितीच्या अर्जातील राहिलेली माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. तात्कालीन जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी अपीलकर्त्याच्या दि.२३/०९/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती दिलेली नाही. म्हणून अपीलार्थीस माहिती उपलब्ध होण्यासाठी विलंब झालेला आहे. सदरच्या विलंबाबद्यल ते जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु.१०,०००/- ची शास्ती का करण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा त्यांनी हा आदेश

मिळाल्यापासून १५ दिवसात आयोगाकडे सादर करावा. अन्यथा त्यांचेवर शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल.

३. तात्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांनी अपीलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन कोणताही निर्णय दिलेला नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये त्यांच्याकडे सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडली नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याबाबतची पुर्नावृत्ती करु नये अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

४. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सदरच्या निर्णयाची एक प्रत तात्कालीन जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांचेकडे खुलाशसाठी पाठवावी. तसेच विद्यमान प्रथम अधिकारी तथा तहसिलदार यांनी सदरच्या निर्णयाची एक प्रत तात्कालीन तहसिलदार यांचेकडे पाठवावी.

५. सदर निर्णयाची एक प्रत स्वंतत्रपणे जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडे पाठविण्यात येत आहे.

६. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.४६८/नाग/२०११, ४६९/२०११, ४७०/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री नानाजी जैदास रामटेके<br>रा. जानबा पो. ईटखेडा<br>ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जलस्वराज्य प्रकल्प अधिकारी<br>जिल्हा परिषद गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>ग्राम पंचायत कार्यालय जानवा<br>ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०५/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २८/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये वर नमुद केलेले तीन द्वितीय अपीले दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०५/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी श्री जी. जे. जाधव ग्रामसेवक, ग्राम पंचायत जानवा हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जलस्वराज्य प्रकल्प अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया हे गैरहजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. ०९/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी ग्राम पंचायत, जानवा यांचेकडे जानवा येथे जलस्वराज्य प्रकल्प योजना राबविण्यात आली असुन प्रकल्प क्र.१ आणि २ च्या संदर्भात केलेल्या बांधकामाबाबत एम.बी. ची नक्कल कॅशबुक नक्कल, लेबर हजेरी नक्कल, इतर खर्च बील रकमेच्या नकला छायांकित प्रती मिळण्याबाबत माहिती मागितली होती. सदरच्या तिनही अपीलांचा माहितीचा विषय एकच असल्यामुळे सदर तीनही अपीलांची सुनावणी एकत्रीत घेण्यासाठी दि. ०७/०६/२०११ रोजी आयोगाच्या कार्यालयातून नोटीस काढून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयात बोलविण्यात आले होते.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी ग्राम पंचायत कार्यालय जानवा ता. अर्जुनी/मोर जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली दि. ०९/१०/२०१० ला दोन अर्ज आणि दि.०८/१०/२०१० ला एक अर्ज असे एकूण ३ अर्ज त्यांनी दाखल केले होते. त्यामध्ये ग्राम पंचायत जानवा येथील जलस्वराज्य प्रकल्प योजना राबविण्यात आलेली असून त्यामध्ये झालेल्या खर्चाचे विवरण व बिलांच्या पावत्या मागितलेल्या होत्या. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही आणि अदयापही एम.बी. रजिस्टरची नक्कल, लेबर हजेरी रजिस्टरची नक्कल, ग्रामदुत धनाच्या बाबतची पावती आणि इतर झालेल्या खर्चाची बीले यांच्या पावत्या मिळाल्या नाहीत म्हणून त्यांनी दि. ०६/१२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.	आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत जानवा श्री गणेश जानकीराम जाधव यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचे वर नमुद केलेले तीनही माहितीचे अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाले होते. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही जलस्वराज्य प्रकल्पाशी संबंधित असल्यामुळे ग्राम पंचायत स्तरावर ही योजना राबविण्यासाठी ग्रामीण पीणपुरवठा व इतर स्वच्छता समिती कार्यरत आहे. त्यांच्या मार्फत ही योजना राबविण्यात येत असते म्हणून अपीलार्थीने मागितलेली माहिती सचिव, जलस्वराज्य प्रकल्प जानवा ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांचेकडे दि. १९/१०/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीचा माहितीचा अर्ज पाठवून

त्यांच्याकडून अपीलार्थीस माहिती पुरवावी असे त्यांना कळविले व त्याची प्रत अपीलार्थीस देऊन आपण मागितलेली माहिती जलस्वराज्य प्रकल्पाचे सचिव यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविले. तथापी ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता समितीकडून त्यांना माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील जलस्वराज्य प्रकल्प अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे दाखल केले. त्याची सुनावणी दि. २८/०४/२०११ रोजी ठेवण्यात आली. परंतू त्यादिवशी अपीलकर्ता हे सुनावणीस गैरहजर होते. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी दि.३०/०४/२०११ रोजी प्राप्त केली आणि सदर माहिती दि. ०१/०५/२०११ रोजी अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झ ााल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र या माहिती मध्ये एम. बी. रजिस्टरची नक्कल, लेबर हजेरीची नक्कल, ग्रामदुतांना दिलेल्या मानधनाची बीले आणि इतर खर्चाची बीले त्यांना मिळाली नाहीत. त्यावर जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, जलस्वराज्य प्रकल्प अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचे कार्यालय शासनाकडील पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय दि.३०/०३/२०११ नुसार जलस्वराज्य प्रकल्प कार्यालय बंद झाले आहे. आणि त्यामध्ये कार्यरत असणारे कर्मचारी त्या-त्या विभागाकडे परत पाठविण्यात आले आहेत. त्यामुळे जलस्वराज्य प्रकल्पाचे संबंधित रेकॉर्ड त्यांच्याकडून अदयाप संबंधित विभागाला हस्तांतरण करावयाचे आहे. संबंधित रेकॉर्डचे हस्तांतरण ज्या अधिकाऱ्यांकडे होईल. त्यांच्याकडून अपीलार्थीने मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याची वरील तीनही अपीले अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील क्र. ४६८/२०११, ४६९/२०११ आणि ४७०/२०११ ही तीनही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत जानवा यांनी जलस्वराज्य प्रकल्प जिल्हा परिषद गोंदिया यांचे कडील रेकॉर्डचे ज्या विभागाकडे हस्तांतरण केले आहे त्या विभागाकडे संपर्क साधून वर नमुद केल्याप्रमाणे राहिलेली माहिती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. सदरची कार्यवाही ही जनमाहिती अधिकारी यांचेकडे संबंधित रेकॉर्ड उपलब्ध झाल्यानंतर १५ दिवसात करावयाची आहे.

२.		अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.४७८/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री तुकाराम काशिरामजी बांडेबुचे<br>७८, रुक्मिणिनगर, खात रोड, भंडारा<br>ता. जि. भंडारा - ४४१९०४ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता<br>नगर परिषद भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०६/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १८/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०६/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद भंडारा श्री नागदेवे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय तथा नगर पालिका भंडारा श्री शंभरकर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.२०/०९/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद भंडारा यांचेकडे नगर परिषद कर्मचारी गृह निर्माण सहकारी संस्था मर्या. रुक्मिणी नगर खात रोड भंडारा या वसाहतीमध्ये रोड व नालीचे मागील २० वर्षात झालेल्या

कामाबाबत माहिती मागितली होती. त्यांना दि. १८/११/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र उपलब्ध झालेली माहिती ही अपूर्ण असल्यामुळे त्यांनी मुख्याधिकारी यांचेकडे दि.०१/१२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ३१/१२/२०१० रोजी देण्यात आला आणि त्यामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस अपूर्ण दिलेली माहिती पूर्ण करुन द्यावी. प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस एकूण १ ते ४ मुद्यांवर माहिती तयार करुन संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली. अपीलार्थीस माहिती उपलब्ध झाल्याबाबतची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविली. अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती त्यांना उपलब्ध झाल्यामुळे त्यांनी समाधान व्यक्त केले म्हणून अपीलार्थीचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.४७७/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री उध्दव डोमा रेवतकर<br>मु. पो. भिसी. वार्ड नं. ५,<br>ता. चिमुर जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>वरोरा<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय चिमुर<br>ता. चिमुर जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०६/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १६/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०६/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचे वतीने ॲड. मेश्राम हे हजर आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२७/०९/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार चिमुर यांच्या कार्यालयाकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन मौजा जामगाव (को) प. ह. नं. १८ मधील संपूर्ण खातेदारांची गावातील फेरफार पंजीची सत्यप्रत देण्यात यावी तसेच (७/१२ ८अ सह) देण्यात यावी. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांचे शेतातील साग व

इतर झाडे ७/१२ वर चढविण्यात आली त्याची ७/१२ ची सत्यप्रत देण्यात यावी. तसेच झाडे चढवितांना तालुका निरिक्षक भूमी अभिलेख यांनी सिमांकन केले असल्यास सत्यप्रत द्यावी. प.ह.न.१८ चे तलाठी हे मुख्यालयी राहत नसल्यामुळे त्यांचा घरभाडे व प्रवास भत्ता पगारामध्ये देण्यात आला असल्यास त्याबाबतची माहिती द्यावी. अशी माहिती मागणी केली होती. परंतू विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित असलेली माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असे ॲड. मेश्राम यांनी सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी श्री तोडकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि. २७/०९/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे न देता तहसिलदार चिमुर यांचे कार्यालयाकडे पोस्टाने पाठविला होता. आणि सदरचा माहितीचा अर्ज त्यांना दि. १५/११/२०१० रोजी प्राप्त झाल्याचे त्यांच्या कार्यालयाकडील आवक नोंदवहीत नंबर २७४ वर नोंदला असल्याचे आयोगासमोर दाखविले. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही तलाठी जामगाव कोमटी यांचेशी संबंधित असल्यामुळे तहसिलदार चिमुर यांचे कार्यालयाकडून सदर अर्ज जनमाहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी यांचेकडे दि. १५/११/२०१० रोजी पाठविला अपीलकर्त्याच्या माहिती अर्जानुसार अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप हे व्यापक असल्यामुळे आणि त्यांनी गावातील सर्व खातेदारांच्या फेरफार पंजीची व ७/१२ ची माहिती मागितलेली असल्यामुळे दि.१६/११/२०१० रोजी पत्र पाठवून त्यांच्या कार्यालयात अपीलार्थीस नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे याचा बोध होण्यासाठी आणि माहिती पाहण्याकरिता दि.१८/११/२०१० रोजी अपीलार्थीस बोलविले होते. परंतू अपीलकर्ता हे तलाठी कार्यालयात आले नाही. म्हणून दि.२९/११/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस असे कळविले की, आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भात आपणास दि. १८/११/२०१० रोजी कार्यालयीन वेळेत माहिती पाहण्यास बोलविले होते परंतू आपण उपस्थित झाले नाहीत. आपणास पाहिजे असलेल्या माहितीची एकूण ९५१ पाने झेरॉक्स करावी लागणारा आहे त्याचा खर्च प्रती पेज रु.२/- प्रमाणे रु.१९०२/- इतका खर्च अपेक्षित आहे या खर्चासाठी त्यांच्याकडे आत निधी उपलब्ध नाही. सदरचा निधी वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त झाल्यानंतर आपणास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि.२९/११/२०१०

च्या पत्रान्वये कळवून त्याची प्रत तहसिलदार चिमुर यांना दिली. आणि अपीलार्थीस खर्चाचा निधी उपलब्ध करुन द्यावा असे कळविण्यात आले. तथापी अपीलार्थीने तहसिलदार चिमुर यांचेकडे दि. ११/११/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२७/१२/२०१० रोजी देण्यात आला आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलार्थीस मुद्दा क्र. २ ची सुधारीत माहिती देणे बाबत आदेश दिले. तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलार्थीस दि.२४/१२/२०१० रोजी तहसिल कार्यालय चिमुर येथे तहसिलदार यांचे समक्ष उपस्थित राहून संपूर्ण साजाचे ७/१२ ८ अ सहीत फेरफार पंजीची पाहणी करुन त्या प्रती उपलब्ध करुन दिल्या. सदर प्रती अपीलार्थीस उपलब्ध झाल्याची माहितीची सही केलेली पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविली. परंतू अपीलार्थीच्या वकीलांचे असे म्हणणे आहे की, त्यांना माहितीची प्रत उपलब्ध झालेली नाही.

४. अपीलार्थीचे वकील आणि जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीस दि. २४/१२/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध झाल्याचे अपीलकर्त्याचे पत्र आयोगासमोर तहसिलदार यांनी दाखविले. तथापी अपीलार्थीस ती माहिती प्राप्त झाली नाही असे अपीलार्थीच्या वकीलांचे म्हणणे असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस पुन्हा सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

P.T.O.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस पुन्हा माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.४७२/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विकास गणपतराव शेंडे<br>नागरी बँक कॉलनी, राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या मागे, हिन्दनगर, वर्धा<br>ता. जि. वर्धा. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>जलसंपदा, पाणी पुरवठा व ग्रामिण विकास<br>मंत्रालय, मुंबई-३२ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>जलसंपदा, पाणी पुरवठा व ग्रामीण विकास<br>मंत्रालय मुंबई-३२ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०६/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०६/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई श्री ल. गो. ढोके, हे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मुंबई श्री चंद्रीकापुरे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.१७/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन जिवन प्राधिकरण जलसंपदा मंत्रालय, जीवन

प्राधिकरण यांनी पुरवठा केलेल्या पाण्याच्या दराबद्यल निर्देश, अधिसुचना इ. संदर्भात १ ते ८ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपीलार्थीस दि. २०/०२/२०११ च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडून २ मुद्यांवर माहिती प्राप्त झाली. मात्र इतर मुद्यावरची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.        आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई श्री ल. गो. ढोके हे उपस्थित आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज जलसंपदा विभागाकडे दि. २४/०१/२०११ रोजी प्राप्त झाला होता. जलसंपदा विभागाने दि. २५/०१/२०११ च्या पत्रान्वये पाणी पुरवठा विभागाकडे सदरचा अर्ज पाठविला. पाणी पुरवठा विभागाच्या नोंदणी शाखेमधून सदरच्या माहितीचा अर्ज दि. ०७/०२/२०११ रोजी त्यांचे कार्यासनास प्राप्त झाला. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी पाणी पुरवठा विभागाशी संबंधित असलेल्या २ मुद्यांबाबतची कागदपत्रे अपीलार्थीस दि. २०/०२/२०११ च्या पत्रान्वये पाठविली. सदरच्या पत्रात असे नमुद केले की, Revision of water rates for supply of water from Maharashtra Jeevan Pradhikaran दि.२७/०८/२००९ चे पत्र आणि Revision of water rates for supply of water from Nhava-Sheva water supply scheme दि. ०७/०५/२०१० चे पत्र या दोनही पत्रांच्या प्रती पाणी पुरवठा विभागाशी संबंधित असल्यामुळे दि. २०/०२/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस पाठवून कळविण्यात आले. तसेच सदर पत्रात असेही नमुद केले की, पाणी पुरवठा विभागाशी संबंधित असलेली दोन मुद्यांची माहिती आपणास उपलब्ध करुन देण्यात आली. अन्य मुद्यांवरील माहिती ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी संबंधित असून ती आपण वित्तीय सल्लागार आणि मुख्याधिकारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सिडको भवन बेलापूर नवी मुंबई यांचेकडून थेट उपलब्ध करुन घ्यावी असे त्यांनी अपीलार्थीस कळविले. मात्र अन्य मुद्यांची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, पाणी पुरवठा विभाग मंत्रालय मुंबई यांनीच प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थीच्या इतर मुद्यांवरील माहिती ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी संबंधित असल्यामुळे वित्तीय सल्लागार व मुख्याधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सिडको भवन बेलापूर नवी मुंबई यांचेकडे अपीलार्थीचा माहितीचा अर्ज पाठवून त्यांच्या विभागाशी संबंधित मुद्यांची माहिती अपीलार्थीस

विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अवर सचिव, पाणी पुरवठा विभाग मुंबई यांनी अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्वरीत वित्तीय सल्लागार व मुख्यलेखाधिकारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नवी मुंबई यांचेकडे पाठवून त्यांनी १५ दिवसात विनामुल्य माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी असे कळवावे व त्याची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.४८४/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विलास भाऊरावजी गुंडतवार<br>रुख्मिणी नगर, श्रीराम मंगल कार्यालयासमोर, वर्धा<br>ता. जि. वर्धा. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक/क्षेत्र संचालक<br>पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर<br>कार्यालय - वनसंरक्षक व क्षेत्र संचालक पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक<br>सेलू घटक नागपूर<br>कार्यालय वनसंरक्षक व क्षेत्र संचालक पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०७/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. १०/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०७/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१३/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक सेलू घटक नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री एस. पी. महात्मे मुख्य

लेखापाल यांना मुख्य लेखापाल या पदावर पदोन्नती तसेच मुख्य लेखापाल या पदाची मानीव तारीख तसेच त्यांच्या सेवा पुस्तकातील मानीव तारीख मंजूर केल्याची प्रत इ. कागदपत्रे मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.११/०२/२०१० च्या पत्रान्वये असे कळविले की, मुद्या क्र. १ च्या संदर्भात सदर माहितीचा सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही. तसेच सेवा पुस्तकाची प्रत त्रयस्थ व्यक्ती बाबतची मागितलेली आहे त्यामुळे मागणी केलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची आहे. म्हणून माहिती अधिकारातील कलम ८ (त्र) प्रमाणे ती देता येत नाही. तसेच श्री एस. पी. महात्मे मुख्यलेखापाल यांनी मानीव तारीख मिळण्याबाबत केलेल्या अर्जाची प्रत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. आणि मानीव तारीख मंजूर केली त्याबाबतच्या आदेशाची प्रत उपलब्ध नाही अशी माहिती त्यांना कळविण्यात आली. त्यानंतर अपीलकर्त्याने दि.२२/०२/२०१० रोजी वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील अर्जाला योग्य त्या शुल्काचे स्टॅम्प चुकीने त्यांच्याकडून लावण्यात आले नाही म्हणून प्रथम अपीलावरील कार्यवाही त्यांना प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीस तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री ए. के. जुगादे आणि विद्यमान जनमाहिती अधिकारी श्री वशिष्ठ हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री जुगादे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.१३/०१/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. १४/०१/२०१० रोजी प्राप्त झाला होता. परंतू अपीलार्थीने मागितलेली माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे मुद्या क्र. १ व ३ ची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली नाही. आणि मुद्या क्र. २ च्या संदर्भात मानीव तारीख मिळण्याच्या अर्जाची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नाही अशी माहिती अपीलार्थीस दि. ११/०२/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली.

४. विद्यमान जनमाहिती अधिकारी श्री वशिष्ठ यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याच्या प्रथम अपील अर्जावर रु.२०/- चे कोर्ट फी स्टॅम्प अपीलार्थीने न लावल्यामुळे अपीलार्थीस दि.०८/०३/२०१० च्या पत्रान्वये कळविले. तथापी अपीलार्थीने त्याची पुर्तता केली नाही. म्हणून सदर प्रथम अपीलावर कार्यवाही करता आली नाही असे त्यांनी सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थीने श्री एस. पी. महात्मे मुख्य लेखापाल यांच्या सेवा पुस्तकाची छायांकित प्रत आणि मानीव दिनांक मंजूर केल्याची प्रत मागितली आहे. अपीलार्थीने मागितलेले दोनही दस्तऐवज हे कार्यालयीन रेकॉर्डशी संबंधित आहेत आणि सदरचे दस्तऐवज हे कार्यालयाकडून तयार करण्यात येत असतात म्हणून कार्यालयाकडून तयार करण्यात येणारे दस्तऐवज अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे माहिती अधिकारान्वये जरुरीचे आहे म्हणून तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी सदरची माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे देता येत नाही असा निर्णय घेतलेला आहे हे माहिती अधिकाराच्या तरतुदीला विसंगत आहे. शासनाच्या कोणत्याही कार्यालयामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवाबाबत जे दस्तऐवज तयार करण्यात येतात त्या दस्तऐवजांमध्ये पारदर्शकता असणे अत्यंत जरुरीचे आहे ही बाब लक्षात घेता अपीलार्थीने मागितलेल्या सेवा पुस्तकाची प्रत आणि मानीव दिनांक मंजुरीची प्रत त्यांना उपलब्ध करुन देणे न्यायोचीत होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या माहिती अर्जात नमुद केल्याप्रमाणे सेवापुस्तकाची छायांकित प्रत आणि मानीव दिनांक मंजूर केल्याची प्रत व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने अपीलार्थीकडून योग्य ते माहितीचे शुल्क भरुन घेऊन उपलब्ध करुन द्यावी.

२. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहितीच्या शुल्काची रक्कम कळवावी. आणि अपीलार्थीने माहितीचे शुल्क भरल्यानंतर अपीलार्थीस त्वरीत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.४८६/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री कृष्णा हेमराज कनोजिया<br>बुध्द नगर, आनंद बुध्द विहारा जवळ, पोष्ट-आंबेडकर मार्ग, नागपूर<br>ता. जि. नागपूर -४४० ०१७ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>ग्राम पंचायत कार्यालय दुर्गापूर<br>ता. जि. चंद्रपूर, | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>ग्राम पंचायत कार्यालय दुर्गापूर<br>ता. जि. चंद्रपूर, | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०७/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०७/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०१/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी ग्राम पंचायत कार्यालय दुर्गापूर ता. जि. चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन दि. २८/०७/२००६ रोजी ग्राम पंचायत दुर्गापूर जि. चंद्रपूर येथे कोणते सचिव किंवा ग्राम विस्तार अधिकारी कार्यरत होते त्यांचे नाव आणि दि. २८/०७/२००६ ला ते ग्राम पंचायत दुर्गापूरला हजर होते किंवा नाही याबाबत माहिती मागितली होती. तसेच दि. २८/०७/२००६ रोजीचे

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना आणि सामान्य फंडाचे रोख पुस्तकाच्या पानाची झेरॉक्स प्रत, त्यावेळचे कॅशबुक कोणी लिहीले आणि त्यावर कोणत्या सचिवाची सही आहे त्याचे नाव याबाबतची माहिती मागितली होती. परंतू त्याबाबत अपीलकर्ता यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी ग्रामपंचायतीकडे दि.०८/०३/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिला नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत कार्यालय दुर्गापूर श्री आर. एम. भानुसे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. ०१/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. ०४/०२/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीस दि.११/०२/२०११ च्या पत्रान्वये दुर्गापूर ग्रामपंचायतच्या दि.२८/०७/२००६ च्या सामान्य फंड खर्चा बाबतची कॅशबुकची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन दिली. आणि त्या प्रतीवर तत्कालिन सचिवाची सही असल्यामुळे अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. सदर माहिती उपलब्ध झाल्याचे अपीलार्थीने मान्य केले. मात्र सदर पत्रावर कोणत्या सचिवाची सही आहे त्याच्या नावाची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही ती माहिती त्यांना मिळणे आवश्यक असल्याचे अपीलार्थीने आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. ११/०२/२०११ च्या पत्रान्वये दि. २८/०७/२००६ च्या कॅशबुकची प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसते. मात्र सदरचे कॅशबुक लिहिले त्यावेळी कोण सचिव कार्यालयात कार्यरत होते ही माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली दिसत नाही म्हणून त्यावेळी कार्यरत असणाऱ्या तत्कालीन सचिवांचे नाव त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी अपीलार्थीस दि.२८/०७/२००६ चे कॅशबुक ज्या तत्कालीन सचिवांनी लिहीले आहे त्या सचिवांचे नाव अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.४९३/नाग/२०११</u>**

१. श्री अजय दयारामजी गोंडाणे - **अपीलकर्ता**
C/o, केंद्रीय कार्यालय, जनसेवा जयलक्ष अन्याय, भ्रष्टाचार निराकरण समिती
न्यू आशिर्वाद नगर, गिरोला (कारधा)
ता. जि. भंडारा

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी - **उत्तरवादी**
जिल्हाधिकारी कार्यालय (बा.व.ई.) प्र. क्र. १, भंडारा
ता. जि. भंडारा

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
जिल्हाधिकारी कार्यालय (बा.व.ई.) प्र. क्र. १, भंडारा
ता. जि. भंडारा

## (आदेश पारित दिनांक ०८/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २२/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०८/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ११/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय (बा.व.ई) प्रकल्प क्र.१ भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन गोसेखुर्द प्रकल्पामध्ये भुसंपादित

झालेल्या जमिनीच्या मोबदल्याबाबत १ ते ४ मुद्यांवर सन २००७ ते आजपर्यंतची माहिती मागितली आहे. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून मुद्या क्र. २ ची माहिती प्राप्त झाली मात्र मुद्या क्र. ३ व ४ ची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी भुसंपादन अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरिता जनमाहिती अधिकारी श्री एच. एल. बागडे अव्वल कारकुन तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भुसंपादन अधिकारी जी. जी. जोशी हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री बागडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. ११/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलार्थीस दि.२४/१२/२०१० च्या पत्रान्वये १ ते ४ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांना मुद्या क्र.३ व मुद्या क्र.४ ची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. २१/०१/२०११ रोजी प्रथम अपील उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) भंडारा यांचेकडे दाखल केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्री जी. जी. जोशी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांच्याकडे दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.०१/०३/२०११ रोजी निर्गमित करण्यात आला. त्यामध्ये त्यांनी मुद्या क्र. ३ आणि ४ च्या माहिती बाबत सविस्तरपणे उहापोह केला असून सदरचे प्रथम अपील निकाली काढण्यात आले आहे असे नमुद केले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी माहितीच्या अर्जातील मुद्या क्र.१ आणि मुद्या क्र.२ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. आणि मुद्या क्र.३ आणि ४ च्या माहिती संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नमुद केल्याप्रमाणे बुडीत क्षेत्राखाली येणाऱ्या प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत जे पेमेंट रजिस्टर आहे त्या पेमेंट रजिस्टरमध्ये प्रकल्पग्रस्तांना देण्यात आलेल्या मोबदल्याची यादी आहे.

म्हणून त्या पेमेंट रजिस्टरची झेरॉक्स प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच मुद्या क्र. ४ च्या संदर्भात भूमि संपादन अधिनियम १८९४ ची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी उपस्थित राहून पेमेंट रजिस्टरच्या झेरॉक्स प्रतींसाठी आवश्यक त्या शुल्काचा भरणा करावा आणि अपीलार्थीने शुल्क भरल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस पेमेंट रजिस्टरची झेरॉक्स प्रत देखील जनमाहिती अधिकारी यांनी त्वरीत उपलब्ध करुन द्यावी. त्याचप्रमाणे अपीलार्थीने नियमानुसार फी भरल्यानंतर भूमि संपादन अधिनियम १८९४ ची प्रत त्वरीत उपलब्ध करुन द्यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.४९४/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रमेश चंद्रभान यावलकर<br>C/o, केंद्रीय कार्यालय, जनसेवा जयलक्ष अन्याय, भ्रष्टाचार निराकरण समिति<br>न्यू आशिर्वाद नगर, गिरोला (कारधा)<br>ता. जि. भंडारा. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यपालन अधिकारी<br>जिल्हा परिषद कार्यालय, गोंदिया<br>ता. जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय अर्जुनी/ सडक<br>ता. अर्जुनी/सडक जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०८/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २२/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०८/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक पंचायत समिती, अर्जुनी/सडक गोंदिया श्री एस. एस. शिरभाते हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांचे तर्फे श्री एस. आर. जनबंधु, अधिक्षक (पंचायत) हे हजर आहेत. तसेच खंड विकास अधिकारी डॉ. बी.आर. कांबळे हे हजर आहेत.

२.    अपीलकर्ता यांनी दि. १३/०१/२०११ रोजी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी पंचायत समिती अर्जुनी/ सडक, जि. गोंदिया यांचेकडे ग्राम पंचायत सडक अर्जुनी येथील आवकजावक रजिस्टर मध्ये खोडतोड बाबत दि. १८/१२/२०१० ला दिलेल्या तक्रार अर्जानुसार चौकशी अहवालाची प्रत व अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांची प्रत इ. बाबत त्यांनी माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र चौकशी अहवालामध्ये ग्रामपंचायतीच्या दोषी कर्मचाऱ्यांबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी उपमुख्य कार्यपालन अधिकारी, (पंचायत) जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे दि.२८/०२/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

३.    आज आयोगापुढे सुनावणीकरिता जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, पंचायत समिती अर्जुनी/ सडक जि. गोंदिया श्री एस. एस. शिरभाते तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी, पंचायत समिती सडक /अर्जुनी डॉ बी. आर. कांबळे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे तर्फे श्री जनबंधु अधिक्षक हे उपस्थित आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री शिरभाते यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलककर्त्याचा दि. १३/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. १८/०१/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही पंचायत समितीमधील पंचायत विभागाशी संबंधित असल्यामुळे त्यांनी पंचायत विभागाकडून माहिती मागितली होती. त्याला अनुसरुन पंचायत विभागाने जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.०३/०२/२०११ रोजी सदर माहिती पाठविली. त्यानंतर अपीलार्थीस माहितीचे शुल्क रु. ४८/- भरण्याबाबत दि. ०८/०२/२०११ च्या पत्रान्वये कळविले. तथापी अपीलार्थीने माहितीचे शुल्क भरले नाही. मात्र त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. सदरचे प्रथम अपील सुरुवातीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे दाखल केले. मात्र प्रस्तुत प्रकरणी खंड विकास अधिकारी सडक / अर्जुनी हे प्रथम अपीलीय अधिकारी असल्यामुळे त्यांनी अपीलार्थीचे प्रथम अपील खंड विकास अधिकारी यांचेकडे पाठविले असे श्री जनबंधु यांनी सांगितले.

४. अपीलकर्त्याचे प्रथम अपील खंड विकास अधिकारी अर्जुनी/सडक यांचेकडे दाखल झाल्यानंतर पुन्हा अपीलार्थीस दि. ०६/०४/२०११ रोजी पत्र पाठवून माहिती घेऊन जाण्याबाबत कळविले. त्यानुसार अपीलार्थीने दि.२८/०४/२०११ रोजी माहितीचे शुल्क भरणा केले. आणि त्याचदिवशी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याचे श्री शिरभाते जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलार्थीने आयोगापुढे मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या तक्रारीवर झालेल्या चौकशी अहवालानुसार आवकजावक रजिस्टर मध्ये खाडाखोड केल्या प्रकरणी दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना मिळाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, चौकशी अहवालाप्रमाणे दोषी कर्मचाऱ्यांवर केलेल्या कार्यवाहची माहिती संबंधित ग्राम पंचायतीकडून मागवून अपीलार्थीस उपलब्ध करुन देता येईल.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या माहिती अर्जातील माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी ग्राम पंचायत मधील आवक जावक रजिस्टर मध्ये खाडाखोड केलेल्या कर्मचाऱ्यांच्याविरुध्द ग्रामपंचायतीने केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी ग्रामपंचायतीमधील आवक जावक रजिस्टरमध्ये खाडाखोड केलेल्या कर्मचाऱ्यांच्या विरुध्द ग्रामपंचायतीने केलेल्या कार्यवाहीची माहिती ३० दिवसात अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

PTO

२.        अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.५००/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री नामदेव शामरावजी गव्हाळे<br>मु. पो. कान्होलीबारा<br>ता. हिंगणा जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>पंचायत समिती हिंगणा<br>ता. हिंगणा जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी<br>ग्राम पंचायत कान्होलीबारा<br>ता. हिंगणा जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १२/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०८/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी ग्राम पंचायत कान्होलीबारा श्री जी. टी. चिव्हाणे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय हिंगणा श्री व्ही. डब्ल्यू भापकर हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दि.२९/०९/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कान्होलीबारा, ता. हिंगणा जि. नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन कान्होलीबारा गावातील एकूण नळांची संख्या तसेच अधिकृत नळांची संख्या, अनधिकृत नळांची संख्या आणि गावातील विहीरींची संख्या इ. बाबत १ ते ७ मुद्यांवर माहिती माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२७/१०/२०१० च्या पत्रान्वये माहितीची फी भरण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार अपीलार्थीने माहितीच्या फी चा भरणा केला. आणि त्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. परंतू उपलब्ध झालेल्या माहितीने अपीलार्थीचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दि.३०/११/२०१० रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कान्होलीबारा श्री जी. टी. चिव्हाणे हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री भापकर उपस्थित आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री चिव्हाणे यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि. २९/०९/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. ०५/१०/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीस गावातील पाणी पुरवठयाच्या नळासंबंधिची १ ते ७ मुद्यांवरील मुद्येनिहाय माहिती दि. २७/१०/२०१० रोजी माहितीचे शुल्क भरल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी विस्तार अधिकारी  यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलार्थीस पुन्हा दि.३०/१२/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती पुरविलेली आहे. दि. २७/१०/२०१० च्या पत्रातील माहिती आणि दि.३०/१२/२०१० च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. मात्र अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की, गावातील अनधिकृत नळांची संख्या त्यांना मिळाली नाही तसेच गावातील नळ लाईनवर बसविण्यात आलेल्या टिल्लू पंपाची माहिती त्यांना मिळाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, गावातील अनधिकृत नळांची संख्या निल आहे आणि टिल्लू पंपांच्या संख्येबाबत त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही असे अपीलार्थीस कळविल्याचे त्यांनी  सुनावणीचेवेळी सांगितले.

यावरुन असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दि.२७/१०/२०१० च्या पत्रान्वये आणि दि.३०/१२/२०१० च्या पत्रान्वये प्राप्त झालेली आहे. टिल्लू पंपांची संख्या या बाबतची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही असे अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी कळविले असल्याचे दिसून येते म्हणून जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस प्राप्त झालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.४९९/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री नामदेव शामरावजी गव्हाळे<br>मु. पो. कान्होलीबारा<br>ता. हिंगणा जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक<br>उच्च शिक्षण विभाग, विदर्भ महाविद्यालय, अमरावती<br>ता. जि. अमरावती. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य<br>अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ<br>ता. जि. यवतमाळ. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १२/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०८/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ श्री रमेश बोबडे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, विदर्भ महाविद्यालय अमरावती यांनी खुलासा सादर केलेला आहे.

२.  अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१३/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य अमोलकचंद महाविद्यालय जि. यवतमाळ यांचेकडे माहिती अधिकाराचा अर्ज सादर करुन विद्यार्थी श्री प्रसाद बापूरावजी येरेकर यांचा आपले महाविद्यालयातील शैक्षणिक कालावधी. तसेच श्री येरेकर यांना शैक्षणिक कालावधीत देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीचे स्वरुप व प्रति वर्षी देण्यात आलेली रक्कम, श्री येरेकर यांची जन्मतारीख, त्यांची दाखल खारीज रजिस्टर नुसार शैक्षणिक पात्रता व वर्ष इ. बाबत माहिती मागितली होती. परंतू त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी सहसंचालक उच्च शिक्षण विभाग अमरावती यांचेकडे दि.१०/०१/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.  जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य अमोलकचंद महाविद्यालय यवतमाळ श्री रमेश बोबडे हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. १३/१०/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. १८/१०/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने माजी विद्यार्थी श्री प्रमोद बापुरावजी  येरेकर यांचे या महाविद्यालयातील प्रवेश व स्कॉलरशिप बाबतची आणि त्यांच्या शैक्षणि पात्रेची माहिती मागितली होती. अपीलार्थीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तात्कालीन जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी अपीलार्थीस दि.१९/१०/२०१० च्या पत्रान्वये असे कळविले की, आपण मागितलेल्या माहितीमध्ये संबंधित विद्यार्थी कोणत्या सत्रामध्ये महाविद्यालयात कोणत्या वर्गात शिकत होता याचा उल्लेख नाही. तसेच सदर  माहिती प्राप्त करण्याकरिता महाविद्यालयाची फी आपण भरलेली नाही. तेव्हा आपण महाविद्यालयात येऊन संबंधित लिपीकांनी सांगितल्यानुसार फी चा भरणा करावा तसेच नविन रितसर अर्ज पुन्हा सादर करुन त्या अर्जासोबत संबंधित फी भरल्याची पावती व संबंधित विद्यार्थ्यांची गुणपत्रिका व इतर सर्व कागदपत्रे जोडावेत जेणे करुन संबंधित लिपीकाकडून सदर माहिती विहीत कालावधीमध्ये आपणास देता येणे सुकर होईल. असे तात्कालीन जनमाहिती अधिकारी  तथा प्राचार्य यांनी अपीलार्थीस कळविले होते.

४.  तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, तात्कालीन जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी स्वेच्छानिवृत्ती स्विकारल्यामुळे आता प्राचार्य म्हणून विद्यमान जनमाहिती अधिकारी हे कार्यरत

आहेत. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला. अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात माहितीचा कालावधी  हा ९० ते ९७ असा दर्शविला होता. माहितीचे कोणतेही विशिष्ट वर्ष नमुद केलेले नव्हते म्हणून कॉलेजमध्ये सुमारे १९९० ते १९९७ या वर्षातील कागदपत्रांचा शोध घेण्यात आला. आणि अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात उपलब्ध झालेली माहिती अपीलार्थीस दि. २९/०६/२०११ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. सदरची माहिती नोंदणीकृत डाकेने पाठविल्याचे जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी सुनावणीचेवेळी सांगितले मात्र सदरची माहिती पोस्टाद्वारे आतापर्यंत मिळाली नसल्याचे अपीलार्थीने आयोगापुढे सांगितले. म्हणून जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी पुन्हा अपीलार्थीस आयोगासमोर दि. २९/०६/२०११ च्या पत्राद्वारे पाठविलेल्या माहितीची एक प्रत विनामुल्य उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीने आयोगासमोर स्विकृत करुन समाधान व्यक्त केले. अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५०२/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री नयन लक्ष्मण साखरे<br>लिटील फ्लॉवर कॉन्हवेंट जवळ, नगिनाबाग वार्ड क्र.१ चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>आरोग्य विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १२/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १८/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०८/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी आरोग्य विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर श्री पी. के. सुरमवार लघुलेखक हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर डॉ ए. बी. कांबळे हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता हे आज आयोगाकडील सुनावणीस  गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.१६/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, आरोग्य विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे आरोग्य विभागात चालणाऱ्या योजनाबाबत तसेच आरोग्य विभागात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांबाबत येणारे अनुदान व लेखाविषयक सन २००५ ते २०१० या वर्षातील  माहिती मागितलेली  दिसून येते. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. २२/०२/२०११ रोजी दिलेला आहे. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.	जनमाहिती अधिकारी श्री सुरमवार यांनी आयोगापुढे असे सांगितले अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने सदर अर्जात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांवर वर्षनिहाय किती निधी प्राप्त होतो व किती खर्च होतो तसेच राबविलेल्या योजनांबाबतचे वर्षनिहाय देयकाच्या छांयाकित प्रती तसेच औषधी व साहित्याची खरेदी बाबतची देयके इ. च्या छायांकित प्रति, वर्षनिहाय देयाकांच्या प्रती आणि समायोजना नंतरच्या देयकांच्या प्रती तसेच औषधी व साहित्याच्या  खरेदी बाबतची देयके इत्यादींच्या छायांकित प्रती  देखील  मागितलेल्या होत्या. सदर माहिती ही सन २००५ ते २०१० या कालावधीतील आहे. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे तसेच जिल्हा परिषदेच्या वेगवेगळया विभागाशी संबंधित असल्यामुळे सदर माहिती ही संकलीत करण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी दि. २२/१२/२०१० च्या पत्रान्वये लेखा अधिकारी रोखपाल शाखा, औषधी संयोजक, आरोग्य विभाग इ. विभागातील कर्मचाऱ्यांशी  संबंधित असल्यामुळे सदर माहिती या संबंधित विभागांच्या जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध करुन देण्याचे कळविले. त्यानुसार अपीलार्थीने मागितलेली माहिती संबंधित विभागाने संकलीत करण्यास सुरुवात केली. परंतू त्यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा सर्व विभागांना दि. १४/०२/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यास स्मरणपत्र पाठविले. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही विस्तृत प्रमाणात असल्यामुळे आणि ५ वर्षांच्या

कालावधीतील असून अपीलकर्त्याने सर्वच देयकांच्या प्रती मागितलेल्या आहेत म्हणून अपीलार्थीने मागितलेल्या सर्व देयकांच्या प्रती पाठविण्यास विलंब झाला त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील जिल्हा आरोग्य विभाग यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. १८/०२/२०११ रोजी घेण्यात आली. आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.२२/०२/२०११ रोजी निर्गमित करण्यात आला. त्यामध्ये अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचे आवश्यक ते शुल्क भरुन अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर अपीलकर्त्यास दि. ०४/०७/२०११ च्या पत्रान्वये संकलीत केलेली संपूर्ण माहिती एकूण पृष्ठ ४९३ विनामुल्य अपीलार्थीस पाठविल्याचे जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. आणि त्याबाबतची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविली.

यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे स्वरुप हे विस्तृत आहे आणि अपीलकर्त्याने सन २००५ ते २०१० या कालावधीतील संपूर्ण देयकाच्या प्रती मागितल्या होत्या. सदरची एकूण ४९३ पृष्ठांची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५०१/नाग/२०११</u>**

१. श्री नयन लक्ष्मण साखरे - **अपीलकर्ता**
लिटील फ्लॉवर कॉन्हवेंट जवळ, नगिनाबाग वार्ड क्र.१ चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी - **उत्तरवादी**
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी - **उत्तरवादी**
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर.

**(आदेश पारित दिनांक १२/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १८/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०८/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रपूर श्री अतुल रा. आदे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रपूर श्री स्टीव्हन अलवारीस हे हजर आहेत.

२.	आज आयोगापुढे सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. जनमाहिती अधिकारी श्री अतुल आदे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.१५/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी श्री तांबे यांच्या मृत्युपूर्वी एक वर्षाच्या कालावधीत किती गाडयांचे हस्तांतरण झाले आणि या हस्तांतरीत केलेल्या गाडयांकडून किती कर वसूल करण्यत आले त्याबाबत व्यवसाय कर भरल्याच्या छायांप्रती मागितलेल्या होत्या. म्हणून अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्या संदर्भातील माहिती संकलीत करण्यात आली. आणि अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे एकूण पृष्ठ १४६० असल्यामुळे अपीलकर्त्यास दि. २६/११/२०१० रोजी माहितीचे शुल्क रु.२८१४/- भरणा करण्याबाबत कळविण्यात आले. त्यामध्ये असे नमुद केले की, वाहन हस्तांतरणाबाबत वेगळी अशी माहिती ठेवण्यात येत नाही. वाहन क्रमांक कळविल्यास आपल्याला माहिती देण्याची व्यवस्था करण्यात येईल. तथापी याबाबत आपणाला रेकॉर्डची तपासणी करावयाची असल्यास आपणाला कार्यालयीन वेळेत रेकॉर्ड पाहण्याची मुभा आहे. असे देखील अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दि.२६/११/२०१० च्या पत्रान्वये कळविले होते. सदरचे दि. २६/११/२०१० चे माहितीचे शुल्क भरण्याचे पत्र अपीलार्थीस दुरध्वनीद्वारे, मोबाईलद्वारे त्यांच्याशी संपर्क साधून घेऊन जाणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात उपस्थित झाले असते तर त्यांना माहितीचे शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्यास सांगण्यात आले असते. तसेच त्यांनी पत्र घेण्यास नकार दिला आणि रकमेचा भरणा केला नाही म्हणून सदरचे माहितीचे शुल्क भरण्याचे पत्र नंतर अपीलार्थीस पोस्टाद्वारे जावक क्र.४९५९ दि.२६/११/२०१० चे दि.०४/१२/२०१० रोजी पाठविले. परंतू अपीलकर्त्याने माहितीच्या शुल्काचा भरणा केला नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४.	आज आयोगापुढे सुनावणीचेवेळी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्त्याचे दि.२८/१२/२०१० चे प्रथम अपील त्यांच्याकडे दाखल झाले होते. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दि.०७/०२/२०११ रोजी घेण्यात आली त्यावेळी अपीलकर्ता सुनावणीस हजर होते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.०९/०२/२०११ रोजी देण्यात येऊन त्यामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी माहिती लपवून ठेवलेली नाही. अपीलार्थीने प्रथम अपीलाच्या सुनावणीचेवेळी माहितीचे पत्र घेण्यास नकार दिल्याने जनमाहिती अधिकारी यांनी

पुनःश्च टपालाने पत्र पाठविले. तसेच अपीलकर्त्यास  रेकॉर्डची तपासणी करुन टिपणी काढावयाच्या असतील तर जनमाहिती अधिकारी यांचे पूर्व परवानगीने तशी टिपणी घ्यावी व जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस पुन्हा संधी उपलब्ध करुन द्यावी. असे प्रथम अपीलाच्या निर्णयात नमुद केले आहे. या प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा अपीलार्थीस दि.१५/०२/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, आपण माहितीचे शुल्क रु.२१४/- या कार्यालयात जमा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी तसेच आपणाला रेकॉर्डची तपासणी करावयाची असल्यास आपणाला कार्यालयीन वेळेत रेकॉर्ड पाहणीकरीता मुभा आहे असे अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा कळविलेले आहे. तरीसुध्दा अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही व रेकॉर्डची पाहणी करण्यास देखील कार्यालयात आले नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५.	जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या माहितीच्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी दि.२६/११/२०१० च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क भरण्याचे अपीलकर्त्यास कळविले आहे म्हणून अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणे संयुक्तिक होईल. तसेच अपीलार्थीस माहितीच्या रेकॉर्डची तपासणी करावयाची असल्यास अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून रेकॉर्डची तपासणी करणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात माहितीच्या शुल्काचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन  घ्यावी.  तसेच त्यांना रेकॉर्डची तपासणी करावयाची असल्यास त्यांनी कार्यालयीन वेळेत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून रेकॉर्डची तपासणी करुन घ्यावी.

२. जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात अपीलकर्त्याने माहितीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर माहिती त्वरीत उपलब्ध करुन द्यावी. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास रेकॉर्डच्या तपासणीकरीता कार्यालयीन वेळेत रेकॉर्ड पाहणीकरीता उपलब्ध करुन द्यावे.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५०३/नाग/२०११</u>**

१. श्री अशोक दत्तुजी मसराम - **अपीलकर्ता**
प्लॉट नं. ६३, आदिवासी ले आऊट, उमरेड रोड (रिंग रोड), नागपूर
ता. जि. नागपूर - ४४० ०३४.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक - **उत्तरवादी**
सहकारी संस्था नागपूर
धनवटे चेंबर्स, सिताबर्डी नागपूर.

३. जनमाहिती अधिकारी तथा उप निबंधक - **उत्तरवादी**
सहकारी संस्था शहर -२, नागपूर
हिन्दुस्थान कॉलनी, अमरावती रोड, नागपूर.

## (आदेश पारित दिनांक १३/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २४/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०९/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १३/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था शहर-२ नागपूर श्री आर. डी. कौसडीकर हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था नागपूर यांचे वतीने श्री संजय कदम हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१५/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर -२ यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन मागासवर्गीय

आदिवासी गृह निर्माण सहकारी संस्था रजि. नं ३१८ (दिघोरी) नागपूर या संस्थेविषयी १ ते ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यामध्ये संस्थेत कार्यरत पदाधिकाऱ्याचे नाव पदनाम व पत्ता, संस्थेच्या सभासदांची उद्यावत यादी व पत्त्यासह, संस्थेची निवडणूक २००२ ला झाली तेव्हापासून आमसभेचे कार्यवृत्त नोंदवही प्रत, संस्थेचे अंकेक्षण अहवालाची प्रत याबाबतची माहिती मागितली होती तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी विभागीय सह निबंधक सहकारी संस्था नागपूर यांचेकडे दि.०७/०३/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतू त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीचेवेळी सांगितले.

३. आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक श्री कौसडीकर हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था नागपूर यांच्या वतीने श्री संजय कदम हे उपस्थित आहेत.

जनमाहिती अधिकारी तथा उप निबंधक श्री कौसडीकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि. १५/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही मागासवर्गीय आदिवासी गृह निर्माण सहकारी संस्था दिघोरी नागपूर या संस्थेशी संबंधित असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज दि. २२/११/२०१० च्या पत्रानुसार संस्थेचे अध्यक्ष/ सचिव यांचेकडे आणि संस्थेने अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले. आणि त्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास देण्यात आली. त्यानंतर अपीलकर्त्यास संस्थेकडून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विभागीय सह निबंधक यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.०६/०४/२०११ रोजी निर्गमित करण्यात आला. आणि त्यामध्ये अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती पैकी मुद्या क्र. १ ची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली असून इतर माहिती ही संस्था स्तरावरील असल्यामुळे संस्थेकडून अपीलकर्त्याने ती माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे नमुद करुन सदरचे प्रथम अपील फेटाळण्यात आल्याचे श्री संजय कदम यांनी सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, सदरच्या संस्थेस शासनाकडून जमीन मिळाली नाही किंवा शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य घेतले नाही. मात्र सदरच्या सेस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये करण्यात आली आहे.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, सदरच्या संस्थेस शासनाकडून जमीन दिलेली नाही किंवा कोणतेही वित्तीय सहाय्य मिळालेले नाही. मात्र सदर संस्था ही सहकारी कायद्यान्वये नोंदणीकृत करण्यात आलेली आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक नागपूर शहर क्र.२ यांनी सहकारी कायद्यातील तरतुदींना अनुसरुन संस्थेकडून माहिती प्राप्त करुन अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक व न्यायोचित होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक नागपूर शहर क्र-२ यांनी अपीलार्थीने मागितलेली माहिती संस्थेडून प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५१०/नाग/२०११</u>**

१. श्री मोरेश्वर सुदामजी उपरे, सहा. शिक्षक - **अपीलकर्ता**
जिल्हा परिषद हायस्कुल, नवेगांव मोरे
ता. पोंभुर्णा जि. चंद्रपूर.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर.

३. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी - **उत्तरवादी**
माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

## (आदेश पारित दिनांक १३/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०९/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १३/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (माध्यमिक) शिक्षण विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर श्रीमती लक्ष्मी विजय कुंभरे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचे तर्फे अधिक्षक श्री रविंद्र दिघोळे हे हजर आहेत.

२.  अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१५/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (माध्यमिक) शिक्षण विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर यांचेकडील दि. ३१/१०/२००२ च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती परंतू त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

३.  आजच्या सुनावणीस आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (माध्य) शिक्षण विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर श्रीमती लक्ष्मी विजय कुंभरे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद यांच्या तर्फे अधिक्षक श्री रविन्द्र दिघोळे हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी श्रीमती कुंभरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१५/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर यांचेकडील दि.३१/१०/२००२ च्या पत्रान्वये मान्यतेचा फेर निर्णय पारित करण्याबाबत योग्य ती नियमानुसार कार्यवाही करावी असे पत्र दिले होते त्या पत्रावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. सदर माहिती ही सुमारे १० वर्षापूर्वीची असल्यामुळे त्या माहितीचा कार्यालयात शोध घेण्यात आला. मात्र अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचा शोध घेऊनही त्या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे त्यांच्या कार्यालयात आढळून आली नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर यांचे दि.३१/१०/२००२ च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीबाबत कार्यालयीन रेकॉर्डचा शोध घेतला असता कोणतीही माहिती दिसून आली नाही. म्हणून माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे लेखी कळविले. जनमाहिती अधिकारी यांचे दि.३१/०१/२०११ चे पत्र अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. त्या अपीलाची सुनावणी दि. ०५/०३/२०११ रोजी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.११/०३/२०११ रोजी निर्गमित करण्यात आला. आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात शिक्षण उपसंचालक नागपूर यांचेकडील दि. ३१/१०/२००२ च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील कार्यालयीन

रेकॉर्डचा शोध घेतला असता माहिती उपलब्ध झाली नाही. तसेच सदर माहिती ही १० वर्षापूर्वीची असल्यामुळे ती उपलब्ध होत नाही असे नमुद करुन सदरचे प्रथम अपील निकाली काढण्यात आल्याचे श्री दिघोळे यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीने मागितलेली माहिती ही सुमारे १० वर्षापूर्वीची आहे सदरच्या माहितीचा जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात शोध घेतला असता त्यांना या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे किंवा दस्तऐवज आढळून आले नाही. याबाबत अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की, उपसंचालक नागपूर यांनी शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद चंद्रपूर यांना त्यांच्या मान्यतेच्या प्रस्तावाबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे कळविले होते. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना पाहिजे होती म्हणून सदरची धारिका शिक्षणाधिकारी किंवा जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध झालेली नाही म्हणून त्यांनी पुन्हा शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे दि.१९/१०/२०१० चे पत्र आणि दि.१०/०२/२०१० चे पत्र दिलेले आहे. मात्र आजपर्यंत त्या पत्रावर देखील केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना मिळाली नाही. म्हणून शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी अपीलकर्त्याच्या दि. १९/१०/२०१० च्या आणि १०/०२/२०१० च्या पत्रावर योग्य ती कार्यवाही करुन अपीलार्थीस त्याबाबत केलेल्या कार्यवाहिची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी उपस्थित राहून जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयातील रेकॉर्डचे निरिक्षण करुन घेणे संयुक्तिक होईल. तसेच अपीलकर्ता यांनी रेकॉर्डचे निरिक्षण केल्यानंतर अपीलकर्त्याला पाहिजे असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे योग्य राहील म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

P.T.O.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी अपीलकर्त्याच्या दि.१९/१०/२०१० च्या आणि दि.१०/०२/२०१० च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता यांनी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून रेकॉर्डचे निरिक्षण करुन घ्यावे. आणि निरिक्षणानंतर पाहिजे असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५१५/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुरेश कवडुजी पद्मशाली<br>पोलीस स्टेशनमागे, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली - ४४२६०५ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक १४/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून श्री बी. एस. मेश्राम हे हजर आहेत.

२.	आज आयोगाच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, गडचिरोली आणिप्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी या पदाचा पद्भारही त्यांच्याकडे असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून ही श्री बी. एस. मेश्राम हे उपस्थित आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री मेश्राम यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दि.१५/११/२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली त्यांच्या कार्यालयाकडे अर्ज सादर केला. सदर अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१८/११/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निमुर्लन समितीकडे शासनाच्या वेगवेगळया विभागाच्या संदर्भात केलेल्या तक्रारीवर समितीने केलेल्या कार्यवाहीबाबत ८ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपीलकर्त्याने दि. १४/०८/२००६ पासून ते ३१/१०/२०१० पर्यंतची माहिती मागितलेली असल्यामुळे सदर माहिती शोधून संकलीत करण्यात आली आणि संपूर्ण माहिती संकलीत केल्यानंतर अपीलार्थीस दि. २१/१२/२०१० च्या पत्रान्वये १ ते ८ मुद्यांपैकी मुद्या क्र. १, मुद्या क्र. ५, मुद्या क्र.६ आणि मुद्या क्र.८ या मुद्यांची उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस प्राप्त करुन देण्यात आली. आणि इतर मुद्ये म्हणजे मुद्या क्र.२, ३, ४ आणि मुद्या क्र.७ या बाबतची वस्तुस्थिती अपीलार्थीस कळविण्यात आली. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील अतिरिक्त जिल्हाधिकारी गडचिरोली यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.०८/०२/२०११ रोजी निर्गमित करण्यात आला आणि त्यामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस मुद्या क्र.२ मुद्या क्र.३ मुद्या क्र.४ आणि मुद्या क्र.७ ची माहिती उपलब्ध करुन द्यावी. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुन्हा दि.२८/०२/२०११ च्या पत्रान्वये मुद्या क्र.२, मुद्या क्र. ३ आणि मुद्या क्र.४ ची माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याची त्यांनी आयोगापुढे पोच दाखविली. तसेच मुद्या क्र. ७ ची माहिती ही राजस्व बचत भवन या महसूल कर्मचारी संघटनेच्या भवना बाबत होती. सदरच्या प्रकरणात चौकशी करण्यात आली व सदरचा चौकशी अहवाल जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे दि. २१/०३/२०११ रोजी ठेवण्यात आला. आणि या समीतीने या प्रकरणाबाबत असा निर्णय घेतला की, प्रस्तुत प्रकरणात कोणताही भ्रष्टाचार झालेला दिसून येत नाही. म्हणून हे प्रकरण समितीने निकाली काढण्याचा निर्णय घेतला असे जनमाहिती

अधिकारी यांनी सांगितले म्हणून मुद्या क्र.७ बाबत जिल्हा स्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीने घेतलेल्या निर्णयाची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.

३. जनमाहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तथापी १ ते ८ पैकी मुद्या क्र. ७ च्या बाबत केलेल्या अंतिम कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्र. ७ बाबात वर नमुद केल्याप्रमाणे झालेल्या अंतिम कार्यवाहीची माहिती विनामुल्य पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५१६/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री योगेन्द्रसिंह किशोरसिंह सोमवंशी<br>प्रसादर ऑटो सर्व्हिसिंग सेंटर समोर, वर्धमान महावीर वार्ड, गणेशनगर, गोंदिया<br>ता. जि. गोंदिया. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद गोंदिया.<br>ता. जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा नगर रचनाकार<br>नगर परिषद गोंदिया.<br>ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १४/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २६/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद गोंदिया श्री दिगंबर मेहर हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद गोंदिया तर्फे श्री व्ही. डी. रंगारी, वरिष्ठ लिपीक तथा सहाय्यक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. ०२/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन दि. २३/०६/२०१० रोजी गणेश नगर येथील श्री निरज रहांगडाले यांच्या अतिक्रमणावर केलेली कार्यवाहीचे आदेश पंचनामा (स्थळ पंचनामा) सहित मिळणे तसेच अतिक्रमणावर कार्यवाही करुन सदर अतिक्रमण शासकीय यंत्रणा नगर पालिका गोंदिया यांच्या सहाय्याने पाडला होता. त्या संबंधी आपल्याला प्राप्त असलेले मुख्याधिकारी यांच्या आदेशाची प्रमाणित प्रत स्थळ पंचनाम्याची माहिती त्यांनी मागितली होती तथापी त्यांना विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी मुख्याधिकारी गोंदिया यांचेकडे दाखल केले आणि दि. २९/०१/२०११ ला प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्त्यास सात दिवसांचे आत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपीलाचे आदेश असतांनाही अपीलार्थीस माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा नगर रचनाकार नगर परिषद गोंदिया श्री दिगंबर मेहर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि. ०२/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्य कार्यालयाकडे दि. ०३/१२/२०१० ला प्राप्त झाला होता. अपीलार्थीने नगर परिषदेचे दि. ०७/०४/२०१० च्या अनुषंगाने दि.२३/०६/२०१० ला श्री निरज रहांगडाले यांचे अतिक्रमणावर केलेल्या कार्यवाहीच्या आदेशाची व पंचनाम्याची प्रत मागितली होती. सदर माहितीचा शोधा घेण्यात आला. तथापी नगर रचना विभागाकडे संबंधित नस्तींचा शोध घेऊनही मुळ नस्ती आढळून आली नाही. म्हणून दि. २९/१२/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस कळविण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. सदरच्या प्रकरणाची मुळ नस्ती शोधणे सुरु असल्यामुळे सध्या माहिती देता येणे शक्य नाही, मुळ नस्ती प्राप्त होताच आपण मागितलेल्या आदेशाची प्रमाणित प्रत देण्यात येईल असे अपीलार्थीस कळविण्यात आले होते. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेतली आणि दि. २९/०१/२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित करुन त्यात जनमाहिती अधिकारी यांनी सात दिवसात अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी असे नमुद केल्याचे श्री रंगारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर पुन्हा अपीलार्थीने मागितलेल्या नस्तीचा शोध घेण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. मात्र पुन्हा शोध घेतल्यानंतरही मुळ नस्ती उपलब्ध झाली नाही म्हणून माहिती देता येणार नाही असे अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा दि. ०५/०७/२०१० च्या पत्रान्वये कळविल्याचे सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीने मागितलेल्या माहितीची मुळ नस्ती जनमाहिती अधिकारी यांनी शोध घेऊनही त्यांच्या कार्यालयात उपलब्ध झाली नाही. म्हणून मुख्याधिकारी नगर परिषद गोंदिया यांनी मुळ नस्ती ज्या विभागाच्या ताब्यात होती किंवा ज्या कर्मचाऱ्यांच्या ताब्यात होती त्याबाबतची चौकशी करावी आणि चौकशी नंतर मुळ नस्ती उपलब्ध न होण्यास कोण जबाबदार आहे त्याची निश्चिती करावी आणि त्यासंबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द त्यंना लागू असलेल्या सेवा शर्ती प्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी आणि या प्रकरणात केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत मुख्याधिकारी, नगर परिषद गोंदिया यांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीची मुळ नस्ती आढळून येत नसल्यामुळे त्याबाबतची चौकशी करावी आणि चौकशी करुन त्याची जबाबदारी निश्चित करावी आणि जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांविरुध्द त्यांना लागू असलेल्या सेवा शर्ती प्रमाणे योग्य त्या कार्यवाहीची माहिती ३० दिवसात अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

P.T.O

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५२६/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोहर धकाते<br>अंचलेश्वर वार्ड, चंद्रपूर<br>ता. जि. गडचिरोली - ४४२४०२ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी<br>C/o, मुख्य वनसंरक्षक कार्यालय नागपूर<br>वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर -४४० ००१ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कक्ष-१३)<br>C/o, मुख्य वनसंरक्षक कार्यालय नागपूर<br>वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर -४४० ००१ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १५/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २४/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कक्ष-१३) श्री जी. टी. कऱ्हाडे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, मुख्य वनसंरक्षक नागपूर कार्यालय श्री एम. जे. गणराज हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २०/१२/२०१० रोजी माहिती जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कक्ष-१३) मुख्य वन सरंक्षक कार्यालय वनभवन सिव्हील लाईन्स नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन सन २००४ मध्ये लेखापाल लिपीक नि- टंकलेखन वाहन चालक आणि शिपाई यांची सरळ सेवेने प्रधान मुख्य वन संरक्षक, म. रा. नागपूर येथे भरती करण्यात आली होती. या संदर्भात माहिती मागितली होती. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरण्याचे पत्र दिले त्यानुसार त्यांनी माहितीच्या शुल्काचा भरणा केला त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहितीमध्ये मुद्या क्र. ९ व मुद्या क्र. ११ ची माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील निकाली काढण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कक्ष-१३) श्री जी. टी. कऱ्हाडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि. २०/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२४/१२/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलार्थीस दि.१२/०१/२०११ च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क रु.१६९/- भरण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार अपीलकर्त्याची दि.२९/०१/२०११ रोजी माहितीच्या शुल्काची मनिऑर्डर प्राप्त झाली आणि अपीलकर्त्यास दि. ०५/०२/२०११ च्या पत्रान्वये १ ते ११ मुद्यांची मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र मुद्या क्र. ९ आणि ११ ची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, मुद्या क्र. ९ च्या संबंधीत अपीलार्थीस जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तसेच सेवा रोजगार कार्यालयाकडून उपलब्ध झालेल्या याद्यांच्या प्रती दिलेल्या आहेत. तसेच मुद्या क्र. ११ च्या संदर्भात शासन परिपत्रक दि. ३०/०१/२००४ ची पुन्हा ज्यादा प्रत माहिती म्हणून अपीलार्थीस आयोगापुढे उपलब्ध करुन दिली. सदरच्या शासन निर्णयाची प्रत अपीलार्थीने आयोगापुढे स्विकृत केली.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.५२३/नाग/२०११**

१. श्री मनोहर धकाते - **अपीलकर्ता**
अंचलेश्वर वार्ड, चंद्रपूर
ता. जि. गडचिरोली - ४४२४०२

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक - **उत्तरवादी**
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, अमरावती
प्रादेशिक कार्यालय, मोर्शी रोड, अमरावती-४४४६०३

३. जनमाहिती अधिकारी तथा प्र. सहाय्यक संचालक (अतां) - **उत्तरवादी**
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, अमरावती
प्रादेशिक कार्यालय, मोर्शी रोड, अमरावती-४४४६०३

**(आदेश पारित दिनांक १५/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २४/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा प्र. सहाय्यक संचालक (अतां) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अमरावती श्री पी. जी. बडगे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अमरावती श्री व्ही. डब्ल्यु. शिरभाते हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०९/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अमरावती यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन अनुसुचित जाती, अनुसुचीत जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग यामधील कर्मचाऱ्यांना नियुक्ती/पदोन्नतीसाठी जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असल्याबाबत माहितीची मागणी केली होती. परंतू जनमाहिती अधिकारी यांचेकडून विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेश त्यांना मान्य नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	जनमाहिती अधिकारी तथा सहा संचालक श्री पी. जी. बडगे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि. ०९/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे दि. १४/१२/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलार्थीस दि. १३/०१/२०११ च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क भरण्यास कळविण्यात आले. मात्र सदरचे पत्र ३० दिवसानंतर अपीलकर्त्यास प्राप्त झाले असल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती मिळावी असे अपीलकर्त्याने सुनावणीचेवेळी सांगितले.

४.	अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीचा माहिती अर्ज जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे दि.१४/१२/२०१० रोजी प्राप्त झाला होता अपीलार्थीस त्यानुसार ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. १३/०१/२०११ च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क भरणेबाबत कळविले सदरचे पत्र अपीलार्थीस ३० दिवसानंतर मिळाले म्हणून अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही. तथापी अपीलकर्त्यास जनमाहिती यांनी विनामुल्य माहिती आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीने आयोगासमोर स्विकृत केली. अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ५२४/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोहर धकाते<br>अंचलेश्वर वार्ड, चंद्रपूर<br>ता. जि. गडचिरोली - ४४२४०२ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक (सं)<br>अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी<br>अनुसूचित जमाती, प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक १५/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २४/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली श्री अशोक वहाणे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक (सं) अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली डॉ. रॉबीन त्रिभूवन हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.०५/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली यांचेकडे दि.३१/१२/२०१० ला अस्तित्वात असलेली तपासणी समिती गडचिरोली येथील पदाधिकाऱ्यांची नमुन्यात २ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरण्यास कळविले. त्यानंतर अपीलार्थीने जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहितीचे शुल्क पाठविले मात्र ते परत आले आणि त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील खारीज करण्यात आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केली.

३. जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, श्री अशोक वाहाणे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि. ०५/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.०६/०१/२०११ रोजी प्राप्त होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांना दि.२९/०१/२०११ च्या पत्रान्वये मुद्या क्र. १ बाबत असे कळविले की, अस्तित्वात असलेल्या अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या रचनेची माहिती त्रैमासिक अहवालामध्ये असून त्यासाठी माहितीचे शुल्क रु ४/- व पोस्टेज खर्च रु ३०/- असे एकूण रु.३४/- चा भरणा करणे बाबत कळविले आणि मुद्या क्र. २ च्या संदर्भात अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली अंतर्गत पूर्ण कोरमने (बहुमताने) निर्णय घेऊन वैध किंवा अवैध ठरविलेल्या अर्जदारांची यादी **www.trti.nic.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच या संदर्भात आपण जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात प्रत्यक्ष येऊन आपणाला कोणती माहिती पाहिजे आहे ती आपल्या अवलोकनार्थ उपलब्ध करुन देता येईल किंवा आपणाला आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रति नियमानुसार विहीत शुल्क देऊन घेता येतील असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविले. मात्र अपीलकर्त्याने माहितीच्या शुल्काचा भरणा केला नाही म्हणून अपीलकर्त्यास मुद्या क्र. १ ची माहिती पाठविता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर अपीलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांनी माहितीच्या शुल्काची फी रु.४/- आणि पोस्टेज खर्च रु.५/- असे एकूण रु.९/- ची मनिऑर्डर जनमाहिती अधिकारी यांचेकडे पाठविली होती. मात्र सदर मनिऑर्डर परत आली त्यावर असलेला पोस्टाचा शेरा त्यांनी आयोगापुढे दाखविला. मात्र सदरची मनिऑर्डर घेण्यास त्यांनी नकार

दिलेला नाही आणि मनिऑर्डर घेऊन पोस्टमन त्यांच्याकडे आलेला नसल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीस मुद्या क्र.१ च्या संदर्भात त्रैमासिक अहवालाची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी आता विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच जात प्रमाणपत्र तपासणी समितीने वैध किंवा अवैध ठरविलेल्या प्रकरणांची यादी शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेली आहे आणि त्या संकेतस्थळाचा नंबर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेला असल्यामुळे अपीलकर्त्याने सदरच्या संकेतस्थळावरुन मुद्या क्र.२ ची माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून सात दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती अर्जातील मुद्या क्र.१ च्या संदर्भात माहितीच्या बाबत त्रैमासिक अहवालाची प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन दिली.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रत प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ५४०/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विलास पांडुरंग माडुरवार<br>नागापुरे यांच्या आटाचक्कीजवळ, हनुमान नगर, दे. गो. तुकुम, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा वन संरक्षक<br>गडचिरोली वनवृत्त गडचिरोली<br>डॉ. आंबेडकर सामाजिक न्यास भवन, कॉम्पलेक्स, गडचिरोली | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन)<br>वनसंरक्षक गडचिरोली वनवृत्त गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक १८/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ३०/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१४/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी श्री एस. डी. गिरी, कार्यालय अधिक्षक, वनविभाग गडचिरोली हे हजर आहेत. श्री एस. पी. हलमारे विभागीय वन अधिकारी (योजना) गडचिरोली हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे आज आयोगापुढे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र आज आयोगापुढे सुनावणीकरिता जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, वनसंरक्षक कार्यालय गडचिरोली श्री एस. डी. गिरी हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन) गडचिरोली श्री एस.जी. हलमारे हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री गिरी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.११/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१६/११/२०१० ला प्राप्त झाला अपीलकर्त्याने सदरच्या माहिती अर्जात श्री एन. बी. लोखंडे सेवानिवृत्त लेखापाल यांच्या स्वेच्छानिवृत्ती प्रकरणाबाबत व इतर प्रकरणाबाबत १ ते २ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही आस्थापना कक्षाशी संबंधित असल्यामुळे माहिती आस्थापना कक्षाकडून संकलीत करण्यात आली आणि त्यानंतर अपीलार्थीस माहितीचे शुल्क रु. ७३/- भरण्याबाबत दि.०४/१२/२०१० च्या पत्रान्वये कळविले. त्यानुसार अपीलकर्त्याने दि.१३/१२/२०१० च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क भरले. आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास दि.१५/१२/२०१० च्या पत्रान्वये पोस्टाद्वारे पाठविण्यात आली. त्यानंतर अपीलकर्त्याने विभागीय वन अधिकारी (नियोजन) गडचिरोली यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.२७/०१/२०११ ला घेण्यात आली. त्यावेळी अपीलकर्ता हजर होते. त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन प्रथम अपीलाचा निर्णय दि.२७/०१/२०११ रोजी निर्गमित केला आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्त्याच्या मुद्या क्र.१ च्या अनुषंगाने सादर केलेल्या माहितीतील कार्यालयीन टिपणी ही कोणत्या कर्मचारी / अधिकारी यांनी सादर केली आहे त्याचे नाव कळविण्यात यावे असे निर्देश प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना दिले.

३. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.३१/०१/२०११ च्या पत्रान्वये मुद्या क्र. १ च्या माहितीतील कार्यालयीन टिपणी ही आस्थापना कक्षाकडून दिली असून त्यावर श्री पी. जे. मंत्रीवार मुख्य लेखापाल यांची स्वाक्षरी आहे अशी माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दि.१५/१२/२०१० च्या पत्रान्वये आणि प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर दि. ३१/०१/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ५४३/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अकबर अली समशेर अली<br>मानव सेवानगर, गणेश मंदीर जवळ, सुरेन्द्रगढ, सेमिनरी हिल्स, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त<br>वाहतुक शाखा, नागपूर शहर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त<br>वाहतुक पश्चिम, नागपूर शहर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.३०/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१४/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतुक पश्चिम नागपूर शहर नागपूर यांचेकडे दि.२९/१२/२०१० रोजी माहितीचा अर्ज सादर करुन मोटार वाहन

अधिनियम ६६/१९२ हे कलम कोणत्या गुन्हयात लागते व त्याचे दंड किती आहे पेट्रोलींग मध्ये कोणते अधिकारी चालान बनवतात, चालानची पावती देतात या बाबतची माहिती मागितली होती. त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उपायुक्त वाहतुक शाखा नागपूर शहर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याने प्रथम अपील त्यांचे निकालात काढले म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त श्री मोरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२९/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या माहिती अर्जात कलम ६६/१९२ हे कलम कोणत्या गुन्हयात लागते व त्याला दंड किती आकारला जातो तसेच पेट्रोलिंग मध्ये कोणते अधिकारी चालान बनवतात तसेच कोणते अधिकारी चालानचे पैसे घेऊन पावती देतात अशी माहिती त्यांनी मागितली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आणि सदरच्या माहितीमध्ये मोटारवाहन कायदा १९८८ चे कलम ६६/१९२ ची छायांकित प्रत तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र तडजोड शुल्काबाबत अधिसुचनेची छायांकित प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या राजपत्रमध्ये तडतोड शुल्काबाबत ज्या ज्या अधिकाऱ्यांना अधिकार दिले आहेत त्याची संपूर्ण माहिती त्यामध्ये आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे म्हणणे असे आहे की, त्यांचे वाहन चालान करतांना चूकीची कलमे लावली आहेत.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांच्याकडे दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि सुनावणीचेवेळी अपीलकर्ता हजर होते. त्यांना सुनावणीचेवेळी जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भात चर्चा केली आणि पुन्हा अपीलार्थीस मुद्या क्र.१ व २ च्या संदर्भात आवश्यक ती माहिती समजावून सांगितली आणि अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज केल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांचे वाहन चालान करतांना चुकीची कलमे लावली आहेत. म्हणून याबाबत अपीलकर्त्याने योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येते.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ५४५/नाग/२०११, अपील क्र. ५४६/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री भिमराव शामराव केवटे<br>४०, सन्मार्गनगर, हुडकेश्वर रोड, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक<br>सहकारी पत संस्था, नागपूर<br>धनवटे चेंबर्स अनेक्स, सिताबर्डी, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | (i) जनमाहिती अधिकारी तथा उप निबंधक<br>सहकारी संस्था, नागपूर शहर-१<br>भांडे प्लॉट चौक, उमरेड रोड, नागपूर<br>(ii) सहकार अधिकारी, श्रेणी-१/प्रशासक<br>भवानीमाता सहकारी पत संस्था मर्या. नागपूर<br>भांडे प्लॉट चौक, उमरेड रोड, नागपूर | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक १९/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि.२९/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये अपील क्र. ५४५/२०११ आणि अपील क्र. ५४६/२०११ अशी दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१४/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२२/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था नागपूर शहर-१ यांचेकडे माहिती अधिकाराखाली दोन अर्ज सादर करुन भवानी माता सहकारी पतसंस्थेच्या संदर्भात १ ते २७ मुद्यांवर माहिती मागितली होती त्यांना काही मुद्यांची माहिती प्राप्त झाली मात्र मुद्या क्र. २, १२, १४, १६, १७ ते २७ या मुद्यांची माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी सदर मुद्यांच्या संदर्भात या संस्थेतील दस्तऐवजांचे निरिक्षण करण्याची परवानगी मागितली होती. परंतू दस्तऐवजांचे निरिक्षण मिळाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विभागीय सहकारी सहनिबंधक संस्था यांचेकडे दाखल केले. मात्र या संस्थेकडूनही त्यांना निरिक्षण मिळाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर-१ श्री राजेन्द्र दाभेराव हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांचे वतीने श्री संजय कदम हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक श्री दाभेराव यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहिती अधिकाराखालील दि.२२/११/२०१० चा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती जी उपनिबंधक कार्यालयाशी संबंधित होती ती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. आणि उर्वरीत माहिती ही संस्थेशी संबंधित असल्यामुळे दि.२६/११/२०१० च्या पत्रान्वये माहितीचा अर्ज संस्थेकडे पाठवून माहिती उपलब्ध करुन देण्याच्या सूचना दिल्या आणि त्याची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. तथापी संस्थेकडून त्यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसत नाही. म्हणून अपीलकर्त्याच्या मागणी प्रमाणे सदर संस्थेला दि.०५/०१/२०११ रोजी कळविण्यात आले. मात्र सदर संस्थेला निरिक्षणा संदर्भात उपनिबंधकांनी जे पत्र दिले त्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास प्राप्त झाली नाही असे अपीलार्थीने आयोगापुढे सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे उपस्थित असलेले श्री संजय कदम यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरच्या संस्थेस शासनाचे कोणतेही वित्तीय सहाय्य मिळत नाही. म्हणून माहिती अधिकाराच्या तरतुदी या संस्थेला लागू होत नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय देऊन अपीलकर्त्याचे प्रथम अपील फेटाळले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना भवानीमाता सहकारी पतसंस्थेच्या मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भातील रेकॉर्डचे निरिक्षण त्यांना करावयाचे आहे. सदर संस्थेस शासनाचे कोणतेही वित्तीय सहाय्य उपलब्ध झाले नसले तरी सदरची संस्था ही सहकारी कायद्या अंतर्गत नोंदणीकृत झालेली आहे. म्हणून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदी ला अनुसरुन उपनिबंधकांनी अपीलकर्त्यास संस्थेचे रेकॉर्ड निरिक्षणास उपलब्ध करुन देण्याच्या सुचना संस्थेस निर्गमित करणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याची दोनही अपीले ही अंशतः मंजूर करण्यास पात्र आहेत.

## **आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील क्र.५४५/२०११ आणि अपील क्र. ५४६/२०११ ही दोनही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत आहेत.

२. उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर-१ यांनी सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय मुंबई यांच्या दि.१६/०१/२००४ च्या सुचना लक्षात घेऊन तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदी लक्षात घेऊन अपीलकर्त्यास रेकॉर्डचे निरिक्षण करुन घेण्यासाठी संस्थेकडून रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्याच्या सुचना निर्गमित कराव्यात आणि त्याची प्रत अपीलार्थीस पाठवावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रत प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.५४९/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती सुनंदाबाई भिमराव सुखदेवे<br>मु. पो. वग<br>ता. कुही जि. नागपूर. | - | **अपीलकर्ती** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी<br>पंचायत समिती कुही<br>ता. कुही जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक<br>ग्राम पंचायत वग<br>ता. कुही जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक १९/०७/२०११)

१. अपीलकर्ती यांनी दि. ३०/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१४/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ती श्रीमती सुनंदाबाई भिमराव सुखदेवे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी श्री अरुण लहानुजी बोंदरे सचिव ग्रामपंचायत हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी, पंचायत समिती कुही श्री पी. के. बमनोटे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम सेवक, ग्राम पंचायत वग, ता. कुही जिल्हा नागपूर यांचेकडे दि.२२/०१/२०११ रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन सन

२००४ ते आजतागायत शासनाकडून प्राप्त झालेला निधी व त्यावरील खर्चाबाबत माहिती मागितली होती. त्यामध्ये श्री संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान वृक्षरोपणाची झालेली कामे दलित वस्ती सुधारणा कामे मा. गांधी तंटामुक्ती तसेच समाजमंदीर इ. बाबत १ ते ७ मुद्यांवर माहिती मागितली होती. परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.१८/०२/२०११ च्या पत्रान्वये असे कळविण्यात आले की, आपण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितली आहे परंतू प्रत्येक मुद्या मागील माहिती मागण्याचा उद्येश नमुद केलेला नाही, त्यामुळे माहिती देण्याबाबत अडचण निर्माण झालेली आहे. तरी माहितीबाबत उद्येश स्पष्ट करावा असे त्यांना सचिव ग्राम पंचायत यांनी कळविले. मात्र माहितीच्या अधिकाराखाली मागावयाचा माहितीचा उद्येश देण्याची आवश्यकता नाही. म्हणून त्यांनी माहितीचा उद्येश कळविला नाही. तथापी त्यानंतर त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्राम पंचायत वग ता. कुही श्री अरुण बोंदरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२२/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या ग्रामपंचायत कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्त्यास दि.१८/०२/२०११ ला उत्तर पाठविले. आणि त्यामध्ये असे नमुद केले की, माहिती मागण्याचा उद्येश स्पष्ट करावा. त्यानंतर अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली. आणि १ ते ७ मुद्यांवर मुद्येनिहाय माहिती तयार करुन दि.१९/०२/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस ग्रामपंचायत कर्मचारी श्री बोरकर यांचे मार्फत पाठविली असता अपीलकर्ती यांचे पतीकडून त्या बाहेरगावी गेल्या असल्याचे कळले. अपीलार्थी हजर नसल्यामुळे त्यांच्या पतीला माहिती घेण्याची विनंती केली परंतू त्यांनी माहिती घेण्यास नकार दिला. त्याबाबत ग्राम पंचायत कर्मचारी श्री बोरकर यांचा लेखी अहवाल सचिव यांनी आयोगापुढे दाखविला. त्यानंतर अपीलकर्त्यास पुन्हा दि.१४/०३/२०११ ला सदरची माहिती ग्राम पंचायत कर्मचारी यांचे हस्ते पाठविली असता मी पंचायत समिती कार्यालयात अपील अर्ज केला आहे तिथेच पाहू असे शब्द बोलून पत्र घेण्यास इन्कार केला त्याबाबतचा ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांचा अहवाल आयोगासमोर सचिव यांनी दाखविला.

४. अपीलार्थीने प्रथम अपील खंडविकास अधिकारी यांचेकडे दाखल केले मात्र अपीलार्थीचा प्रथम अपीलाचा अर्ज खंड विकास अधिकारी यांचेकडे दि.१५/०३/२०११ च्या पत्रान्वये दाखल झाला. त्यामध्ये त्यांनी सचिव, ग्राम पंचायत वगकडून मागितलेली माहिती दि.१५/०३/२०११ ला प्राप्त झाल्यामुळे अपील अर्ज रद्य करावा असे त्यात नमुद केले होते म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय घेण्यात आला नाही असे श्री बमनोटे यांनी आयोगापुढे सांगितले.

५. अपीलकर्ती तसेच जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत वग, ता. कुही आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती कुही यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्तीस त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन दि.१९/०२/२०११ च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी १ ते ७ मुद्यांवर मुद्येनिहाय माहिती तयार करुन ग्राम पंचायत कर्मचाऱ्यामार्फत पाठविली होती परंतू अपीलकर्ती बाहेरगावी गेल्यामुळे सदरची माहिती अपीलकर्तीच्या पतीने स्वीकारली नाही. त्यानंतर सचिवांनी पुन्हा अपीलकर्तीस दि.१४/०३/२०११ रोजी माहिती पाठविली परंतू त्यावेळी देखील अपीलार्थीने ती स्विकारली नाही. त्याबाबतचा पंचनामा सचिव व सरपंच यांनी केलेला दिसून येतो. तथापी याबाबत अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की, त्यांच्याकडे कुणीही माहिती आणलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्तीस आयोगासमोर देखील माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी तयार आहे त्या प्रमाणे आयोगासमोर अपीलार्थीस सदर माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली आणि ती माहिती अपीलार्थीने स्विकृत केली. अपीलकर्ती यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्तीचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

P.T.O.

# **आ दे श**

१. अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५५३/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री नयन लक्ष्मण साखरे<br>फ्लॉवर कान्व्हेंट जवळ, नगिनाबाग वार्ड क्र.५, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कार्यालय चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २०/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ३०/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१५/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (माध्यमिक) शिक्षण विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर श्रीमती लक्ष्मी विजय कुंभरे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद चंद्रपूर श्री आर. पी. देशपांडे हे हजर आहेत.

२. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी शिक्षण विभाग (मा) जिल्हा परिषद चंद्रपूर श्रीमती लक्ष्मी कुंभरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.२०/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने गुरुवंदन महिला कल्याणकारी मंडळ द्वारा संचालीत स्नेहा माध्यमिक विद्यालयाचे शाळा तपासणी अहवाल शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी खोटे तयार करुन मोठया प्रमाणात घोळ केल्याबद्यल त्यांचेवर काय कार्यवाही केली तसेच त्या शाळेच्या सुरुवातीच्या सत्रापासून आजपर्यन्तचे शाळा तपासणी अहवाल आणि ते कोणत्या अधिकाऱ्यांनी केले त्यांची नावे मागितलेली आहेत. त्यानुसार माहिती काढण्यात आली आणि अपीलार्थीस दि.१३/१/२०११ रोजी पत्र देऊन कळविण्यात आले की, आपण मागणी केलेली माहिती या कार्यालयात तयार झालेली आहे तरी त्या माहितीचे शुल्क रु.१०/- चा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

त्यानुसार अपीलकर्ता दि. २०/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित झाले आणि त्यांनी माहितीचे शुल्क रु. १०/- चा भरणा केला. आणि त्यानंतर त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्याचदिवशी अपीलार्थीस देण्यात आली. त्यामध्ये असे नमुद केले की, आपल्या तक्रारी संदर्भात दि.१२/०८/२०१० अन्वये चौकशी करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. चौकशी अहवाल प्राप्त होताच उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपीलार्थीस कळविले होते आणि अपीलकर्त्याच्या मागणी प्रमाणे स्नेहा विद्यालय दाताळा यांचे सन २००८-२००९ आणि सन २०१० या कालावधीच्या तपासणी अहवालाचे ८ पेजेस उपलब्ध करुन दिले. मात्र त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी प्रथमतः दि.०९/०२/२०११ ला घेण्यात आली. परंतू त्यादिवशी अपीलकर्ता हे गैरहजर राहिले त्यामुळे दि.०५/०३/२०११ ला सुनावणी घेण्यात आली आणि त्या निर्णयात असे नमुद केले की, चौकशी अहवालाची प्रत प्राप्त होताच जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्याची प्रत उपलब्ध करुन द्यावी असे श्री देशपांडे शिक्षणाधिकारी (मा) यांनी आयोगापुढे सांगितले.

३. प्रस्तुत प्रकरणात जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, चौकशीचा अहवाल त्यांच्याकडे अदयाप प्राप्त झालेला नाही. तो प्राप्त झाल्यानंतर त्याची प्रत अपीलार्थीस त्वरीत उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या तक्रार अर्जावर चौकशी पूर्ण झाल्यानंतर व चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सदर चौकशी अहवालाची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसांचे आत त्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५५८/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री गणपत नारायण वणीकर<br>डॉ. रुढे दवाखाना समोर, वनश्री कॉलनी, नवेगांव कॉम्लेक्स, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग)<br>जिल्हा परिषद कार्यालय, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग)<br>जिल्हा परिषद कार्यालय, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २०/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. १९/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१५/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जिल्हा परिषद गडचिरोली श्री बी. एन. हिरे हे हजर आहेत. श्री पी. आर. किर्ती कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद गडचिरोली हे हजर आहेत.

२.	आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद गडचिरोली श्री बी. एन. हिरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. १९/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.३०/११/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या माहिती अर्जात मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडील पारित आदेश दि.१०/०८/२०१० अन्वये शाखा अभियंता अरविंद चव्हाण यांचेवर शिस्त भंगाच्या कार्यवाहीची शिफारस केली होती. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. ०३/०१/२०११ च्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांना पाठविण्यात आल्याचे जनमाहिती यांनी सांगितले. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचे निदर्शनास आयोगाकडील अपील क्र. १००२/२०१० पारित आदेश दि.१०/०८/२०१० च्या आदेशाचा संबंधित अहवाल मागितला. संवर्ग विकास अधिकारी गडचिरोली यांनी त्यांचेकडील दि.२२/०२/२०११ च्या पत्रान्वये त्यांचा अहवाल पाठविला सदरचा अहवाल जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे दि.०३/०३/२०११ रोजी प्राप्त झाला आणि त्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दि.२८/०३/२०११ रोजी उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

३.	त्यानंतर प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्ता यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली होती. प्रथम अपीलाच्या सुनावणीचेवेळी अपीलकर्ता हजर होते. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणात संवर्ग विकास अधिकारी गडचिरोली यांचेकडून अहवाल प्राप्त झाला नव्हता म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी संवर्ग विकास अधिकारी गडचिरोली यांना स्मरण पत्र पाठवून अहवाल मागवावा असा प्रथम अपीलाचा निर्णय दि.२२/०२/२०११ रोजी दिला असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री किर्ती यांनी आयोगापुढे सांगितले.

४.	जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०३/०१/२०११ च्या पत्रान्वये आणि प्रथम

अपीलाच्या निर्णयानंतर दि.२८/०३/२०११ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र आयोगाकडील दि.१०/०८/२०१० रोजी पारित केलेल्या आदेशावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यवाही करावयाची असल्याचे आयोगाच्या निर्णयात नमुद केले आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संबंधात घेतलेला निर्णय अपीलार्थीस कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रस्तुत प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.५६०/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राजेश नवलकिशोर ठाकूर<br>विशाखा निवास, अजय नगर, अंबाझरी हिल टॉप, नागपूर<br>ता. जि. नागपूर-४४००३३ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत)<br>पंचायत समिती हिंगणा<br>ता. हिंगणा जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक<br>ग्राम पंचायत शिरुळ<br>ता. हिंगणा जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २१/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ३०/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१५/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा ग्राम सेवक , ग्राम पंचायत शिरुळ श्री राजु नथ्थुजी सडमाके हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी श्री व्ही डब्ल्यु भापकर विस्तार अधिकारी, पंचायत समिती हिंगणा हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०१/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम सेवक, ग्राम पंचायत शिरुळ ता. हिंगणा यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्राम पंचायत शिरुळ च्या संबंधात एकूण १ ते १३ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यामध्ये ग्राम पंचायत कार्यालयाची रचना व ग्रामपंचायतीच्या कार्याबद्यलची माहिती. ग्रामसेवकाचे अधिकार व कर्तव्य ग्राम पंचायत अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती ग्रामपंचायतीचे आर्थिक नियोजन, प्रत्येक बांधकामाकरीता कोणकोणत्या कंत्राटदारांनी निविदा भरल्या त्या सर्व भरलेल्या निविदांची छायांकित प्रत, ग्रामपंचायत अंतर्गत सर्व बी.पी.एल. लाभार्थीच्या निवडीच्या ठरावाची छायांकित प्रत इ. माहिती दि.०१/०१/२००७ ते दि.३१/१२/२०१० च्या कालावधीतील मागितलेली आहे. परंतू त्यांना विहीत मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विस्तार अधिकारी पंचायत समिती हिंगणा यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्तीची कार्यवाही करावी अशी अपीलार्थीने सुनावणीचेवेळी आयोगापुढे विनंती केली.

३. आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री राजू नथ्थुजी सडमाके हे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री भापकर हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री सडमाके यांनी आयोगापुढे सांगिते की, अपीलार्थीचा दि.०१/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तथापी कार्यबाहुल्यामुळे अपीलार्थीस ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि जनमाहिती अधिकारी यांनी १० दिवसात अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रथम अपीलाचा निर्णय दि.१७/०३/२०११ रोजी देण्यात आला असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे आणखी असेही सांगितले की, प्रथम अपीलाचा निर्णय त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. परंतू कार्यबाहुल्यामुळे १० दिवसात ते अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देऊ शकले नाही. तथापी आता त्यांनी माहिती तयार केली असून अपीलार्थीस ती माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी त्यांनी दर्शविली त्यानुसार सुनावणीचेवेळी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. सदर माहिती

अपीलार्थीने स्विकृत केली. मात्र माहिती विलंबाने मिळाल्याबद्यल जनमाहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कार्यवाही करण्यात यावी अशी अपीलार्थीने मागणी केली.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांच्या दि.०१/०१/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसात कोणतीही माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर देखील माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तथापी आज आयोगासमोर सुनावणीचेवेळी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू सदर माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांना विलंबाबाबत खुलासा विचारला असता त्यांनी असे सांगितले की, कार्यबाहुल्यामुळे त्यांना अपीलार्थीस माहिती देण्यास उशीर झाला मात्र विलंबाबद्यल केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही. कारण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (१) च्या तरतुदी नुसार ३० दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे म्हणून विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्राम पंचायत शिरुळ यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु. ५०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.

३. सदरच्या शास्तीची वसूली संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती यांनी जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून कपात करुन ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " मध्ये जमा करावी.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५६४/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री गोविंद महादेव खरे<br>०३, लाडीकर ले-आऊट, मानेवाडा रोड, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी<br>प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (शहर)<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी<br>प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (शहर)<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २१/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ३१/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१५/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री श्रीकांत वासूदेव पुरोहित हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री एस. बी. बढीये हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांचे वतीने ॲड मंडलेकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दि.२७/०८/२०१० रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन जनमाहिती अधिकारी तथा सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी नागपूर शहर यांचेकडे विभागीय पदोन्नती निवड समितीच्या झालेल्या सभांच्या बाबत दि.०१/०१/१९८८ ते दि.३१/१२/२००८ या कालावधीतील १ ते ५ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. परंतू त्यांना ३० दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि.१९/१०/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचेवर शासतीची कार्यवाही करावी असे ॲड. मंडलेकर यांनी आयोगापुढे सांगितले.

३.	जनमाहिती अधिकारी तथा सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी नागपूर शहर १ श्री पुरोहित हे आयोगापुढे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.२७/०८/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने दि.०१/०१/१९८८ ते दि.३१/१२/२००८ या कालावधीत विभागीय पदोन्नती निवड समितीच्या झालेल्या सभांबाबत १ ते ५ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्या माहितीला अनुसरुन अपीलार्थीस दि.२९/०९/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाली परंतू प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण असल्याचे अपीलार्थीच्या वकीलांनी सांगितले. तसेच मुद्या क्र. १ मध्ये दि.०१/०१/१९८८ ते ३१/१२/२००८ या कालावधीत विभागीय पदोन्नती संदर्भात निवड समितीच्या झालेल्या सभांच्या कार्यवृत्तांताच्या प्रती मागितल्या होत्या त्यांना फक्त दि.२४/०६/२००४ आणि दि.१०/०३/२००५ रोजीच्या निवड समितीच्या बैठकांची माहिती दिली आणि पूर्वीची माहिती उपलब्ध नाही असे त्यांना कळविले. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या मागणी प्रमाणे दि.०१/०१/१९८८ ते दि.३१/१२/२००८ या कालावधीत ज्या निवड समितीच्या सभा झालेल्या आहेत त्यांच्या कार्यवृतांताच्या प्रती देखील उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचे सांगितले म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी सदर कालावधीतील ज्या निवड समितीच्या सभा झाल्या आहेत त्याबाबतच्या कार्यवृतांताच्या प्रती देखील अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तथापी त्या

कालावधीत  निवड समितीच्या सभा झाल्या नसतील तर त्याप्रमाणे देखील अपीलार्थीस वस्तुस्थिती कळविणे योग्य राहील. तसेच मुद्या क्र.३ व मुद्या क्र.४ च्या बाबत क्लार्क यांच्या पदोन्नती संदर्भात झालेला पत्रव्यवहार आणि परिवहन आयुक्त कार्यालयाकडून नागपूर कार्यालयाकडे झालेला पत्रव्यवहार यांच्या प्रती देखील उपलब्ध करुन देणे योग्य होईल. तथापी तसा पत्र व्यवहार झालेला नसल्यास त्याची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. त्याचप्रमाणे मुद्या क्र.५ बाबत जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या विभागाच्या वेबसाईटवरुन अपीलकर्त्यास आवश्यक ती परिपत्रके उपलब्ध होवू शकतील असे अपीलार्थीस कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलार्थीच्या माहिती अर्जात नमुद केल्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्र.३, मुद्या क्र.४ आणि मुद्या क्र.५ ची माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच वरील कालावधीतील विभागीय पदोन्नती निवड समितीच्या सभा होवूनही सभेचे कार्यवृत्तांत उपलब्ध नसल्यास त्याची जबाबदारी संबंधित कर्मचाऱ्यांवर निश्चित करुन त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या दि.२७/०८/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्यानंतर दि.२९/०९/२०१० च्या पत्रान्वये अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला दिसून येतो. त्यामुळे सदर विलंबास जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. या विलंबाबद्यल त्यांना खुलासा विचारला असता त्यांनी असे सांगितले की, कार्यबाहुल्यामुळे ३० दिवसात ते माहिती देऊ शकले नाही तथापी जनमाहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही म्हणून सदर विलंबाबद्यल त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु.५०००/- ची शास्ती करण्यात येत आहे. सदर शास्तीची वसूली उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रादेशिक परिवहन कार्यालय

नागपूर शहर यांनी करावयाची असून ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " मध्ये जमा करावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.५७१/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोहर धकाते<br>अंचलेश्वर वार्ड, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर-४४२ ४०२ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन)<br>मुख्य वनसंरक्षक (प्रा) अमरावती कॅम्प, अमरावती<br>ता. जि. अमरावती-४४४ ६०२ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक<br>मुख्य वनसंरक्षक (प्रा) अमरावती कॅम्प, अमरावती<br>ता. जि. अमरावती - ४४४६०२ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २६/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २९/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१६/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, मुख्य वन संरक्षक अमरावती हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा डॉ. डी. बी. धुडे विभागीय वन अधिकारी दक्षता अमरावती हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१८/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक (प्रा) अमरावती कॅम्प अमरावती यांचे कार्यालयाकडे दि.०७/१०/२०१० पासून दि.१८/११/२००३ पर्यंत सरळ सेवेने भरती करण्यात आलेल्या तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांची यादी तसेच उमेदवारांची शिफारस करणाऱ्या सेवा योजन केंद्राचे नांव व यादी, सरळ सेवेने भरती करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचा नियुक्ती प्रवर्ग कळविण्यात यावा अशी एकूण ३ मुद्यांवर माहिती माहिगतली होती. त्यांना विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि. १०/०१/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलकर्त्यास माहिती प्राप्त झाली पंरतू सदर माहिती ही अपूर्ण असल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, मुख्य वनसंरक्षक कार्यालय अमरावती श्री जाधव यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.१८/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२४/११/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील आस्थापना शाखेशी संबंधित असल्यामुळे त्यांनी सदरच्या माहितीचा अर्ज आस्थापना शाखेकडे पाठवून त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास कळविले. आस्थापना शाखेने जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.२५/११/२०१० च्या पत्रान्वये असे कळविले की, सदरच्या कर्मचाऱ्यांची यादी संबंधित वन विभाग यांचेकडे प्राप्त करण्यास कळवावे. म्हणून त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दि. २६/११/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी, उप वनसंरक्षक अमरावती वन विभाग तसेच पूर्व मेळघाट वन विभाग चिखलदरा व पश्चिम मेळघाट वनविभाग परतवाडा तसेच बुलढाणा वन विभाग बुलढाणा यांचेकडे अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज हस्तांतरण करुन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळविले. व त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवून त्यांना त्या- त्या विभागाशी संपर्क साधून माहिती प्राप्त करावी असे कळविले. तसेच आस्थापना शाखेकडून प्राप्त झालेली माहिती अपीलकर्त्यास पाठविण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील विभागीय वन अधिकारी (नियोजन) मुख्य वनसंरक्षक अमरावती यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले

की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस १५ दिवसांचे आत विनामुल्य माहिती पुरवावी. प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.२३/०३/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. परंतू त्यांना यादी प्राप्त झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्यास कर्मचाऱ्यांची यादी देखील दि.०१/०७/२०११ ला रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले आहे. तथापी सदरचे रजिस्टर्ड पत्र अपीलकर्त्यास अद्याप प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुन्हा दि.०१/०७/२०११ च्या पत्रान्वये पाठविलेल्या पत्राची एक जादा प्रत आयोगापुढे उपलब्ध करुन दिली आणि ती प्रत अपीलार्थीने स्विकृत केली आणि माहिती मिळाल्याबद्यल समाधान व्यक्त केले. अपीलकर्ता यांना जनमाहिती यांचेकडून आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५७२/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोहर धकाते<br>अंचलेश्वर वार्ड, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर-४४२ ४०२ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)<br>जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२<br>शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परषिद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २६/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ३०/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१६/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी शिक्षण विभाग श्री डेकाटे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.१०/११/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे श्री उईके वरिष्ठ लिपीक, शिक्षण विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी बनावट प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी मिळवीली म्हणून त्याबाबत तक्रार दिली

होती त्या तक्रारीवर काय कार्यवाही करण्यात आली अशी माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून आवश्यक ती माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे आणि त्याबाबत अपीलकर्ता यांचे समाधान झाले असल्यामुळे त्यांनी दाखल केलेले दि.३०/०३/२०११ चे अपील ते मागे घेत आहेत असे त्यांनी आयोगापुढे सांगितले म्हणून अपीलकर्ता यांनी अपील मागे घेण्याचे लेखी निवेदन सादर केले असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५८२/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मारोती गणपत वाघमारे<br>ह. मु. बुध्दभूमी गडचांदुर<br>ता. कोरपना जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर.<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर.<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २८/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे करमणुककर निरिक्षक जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर श्री एच. जे. दानव हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री जी. एस. खंडाळे नायब तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे आज आयोगापुढे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे वतीने हजर असलेले श्री एच. जे. दानव करमणुककर निरिक्षक हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.१६/१०/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२२/१०/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्याचा अर्थबोध होत नव्हता म्हणून अपीलकर्त्यास दि.०२/११/२०१० रोजी पत्र पाठवून त्यांच्या कार्यालयामध्ये उपस्थित राहून आवश्यक असलेली माहिती घेऊन जाण्याबाबत कळविले. त्यानंतर अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात दि.२६/११/२०१० ला उपस्थित झाले आणि त्यांना एकूण ५ मुद्यांवर माहिती पाहिजे आहे असे जनमाहिती अधिकारी यांना सांगितले. अपीलार्थीने सदरच्या माहिती मध्ये त्यांच्या डीश केबल व्यवसायाच्या संदर्भात १ ते ५ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.०४/१२/२०१० रोजी आवश्यक ती माहिती पोस्टाद्वारे उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. आणि त्याचा पुरावा त्यांनी आयोगापुढे दाखविला.

३. त्यानंतर अपीलार्थीने अप्पर जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्याचे नायब तहसिलदार श्री खंडाळे यांनी आयोगापुढे सांगितले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.१८/०१/२०११ रोजी घेण्यात आली. सदर सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. तथापी अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे प्रथम अपील खारीज करण्यात आल्याचे श्री खंडाळे यांनी सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेल्या प्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५८३/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मारोती गणपत वाघमारे<br>ह. मु. बुध्दभूमी गडचांदुर<br>ता. कोरपना जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>राजुरा.<br>ता. कोरपना जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय कोरपना.<br>ता. कोरपना जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २८/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी श्री हिरामन तुकाराम झिरवाड तहसिल कोरपना हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी श्री एम. ऐ. राऊत उपविभागीय अधिकारी राजुरा हजर आहेत.

२. आज आयोगापुढे सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार कोरपना श्री हिरामन झिरवाड हे हजर आहेत.

त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१९/१०/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२२/१०/२०१० रोजी प्राप्त झाला अपीलकर्त्याने सदरच्या माहिती अर्जात अंतरगाव बुद्रुक येथील केबलचालकांचा व्यवसाय सुरळीत करुन देण्याच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती तसेच ६० व ६५ वयाच्या माणसांकरीता देण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती आणि शासनाचे अधिकारी तसेच पदनाम अशा विविध मुद्यांची माहिती अपीलार्थीने मागितली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी अपीलकर्त्यास दि.२५/१०/२०१० च्या पत्रान्वये ३ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिल्याचे आयोगापुढे सांगितले. सदरचे दि.२५/१०/२०१० चे पत्र अपीलार्थीस शिपायामार्फत हस्तदेय पाठविलेले आहे.

३. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी यांचेकडे दि.१५/१२/२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.१२/०१/२०११ व दि.१८/०१/२०११ रोजी घेण्यात आली होती. सदर तारखेस सुनावणीकरिता अपीलार्थी हजर होते. आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.१८/०१/२०११ रोजी देण्यात आला आणि त्यामध्ये जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार कोरपना यांनी अपीलकर्त्यावर आकारलेल्या थकीत करमणुक कराची पडताळणी ७ दिवसांचे आत करुन अपीलार्थीस अपेक्षित असलेली माहिती १० दिवसात पुरवावी असे नमुद केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या थकीत करमणुक कराची पडताळणी केलेली दिसून येत नाही. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी थकीत कराच्या संदर्भात पडताळणी करुन आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार कोरपना यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार अपीलकर्त्यावर आकारलेल्या थकीत करमणुक कराची पडताळणी करुन अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती व्यक्तीशः किंवा रजिस्टर्ड पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

## <u>अपील क्र.५७४/नाग/२०११</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री नंदलाल परशराम अलघरे<br>नार्थ नवचैतन्य व्यसन मुक्ति केन्द्र रोड, श्री. पांडे हयांचे घराजवळ,<br>झिंगाबाई टाकळी, गायत्रीनगर, प्लॉट नं. ४३, नागपूर<br>ता. जि. नागपूर-३०. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त<br>परिमंडळ क्र.४, नागपूर शहर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त<br>सक्करदरा विभाग, नागपूर शहर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २७/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ०५/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१६/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २७/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी श्री संतोष म. वानखडे सहा. पोलीस आयुक्त सक्करदरा विभाग हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ ४ यांचे तर्फे श्री योगेश कामाले, पोलीस उप निरिक्षक हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.३१/०७/२०१० रोजी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त सक्करदरा विभाग नागपूर शहर नागपूर यांचेकडे प्रकरण क्र.१ ते ६ मध्ये कारणे दाखवा नोटीसी प्रमाणे जी कार्यवाही झालेली आहे त्या संदर्भात माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२६/०८/२०१० रोजी माहिती प्राप्त झाली मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपायुक्त परिमंडळ क्र.४ नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त श्री संतोष वानखडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.३१/०७/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या माहितीला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दि.२६/०८/२०१० रोजी त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस पाठविल्याचे सांगितले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र सदरच्या माहिती मध्ये फक्त क्राईमची माहिती त्यांना मिळाली मात्र पोलीस उप निरिक्षक सक्करदरा यांनी वरिष्ठांना पाठविलेल्या अहवालाची प्रत त्यांना मिळालेली नाही. सदरच्या अहवालाची प्रत त्यांना मिळणे आवश्यक आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. आज आयोगापुढे सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले पोलीस उपनिरिक्षक श्री योगेश कामाले यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाले होते. त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.२७/०९/२०१० रोजी देण्यात आला आणि त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्त्याचे प्रकरण क्र. १ ते ६ मधील नमुद गुन्हयाचे दाखल करणारे व तपासी अधिकारी तसेच गुन्हयाच्या सद्यः वस्तुस्थिती बाबत तसेच इतर माहिती आणि पोलीस स्टेशनच्या रेकॉर्डमध्ये उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास सात दिवसांचे आत देण्यात यावी. त्याला अनुसरुन अपीलार्थीस पुन्हा जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दिल्याचे सुनावणीचेवेळी सांगितले.

५.   अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती मध्ये प्रकरण क्र. १ ते ६ च्या बाबतीत पोलीस निरिक्षक सक्करदरा यांनी वरिष्ठांकडे पाठविलेल्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.   अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या माहिती अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रकरण क्र. १ ते ६ च्या संदर्भात पोलीस निरिक्षक सक्करदरा यांनी वरिष्ठांकडे पाठविलेल्या अहवालाची प्रत विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२.   अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५७७/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री बाजीराव झिबलाजी भागडकर<br>मु. बाबुरवाडा<br>ता. पारशिवनी जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी<br>पंचायत समिती पारशिवनी<br>ता. पारशिवनी जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>गट ग्रामपंचायत आमगाव बाबुरवाडा<br>ता. पारशिवनी जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २७/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१६/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २७/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. डी. आर. भेदरे हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत आमगाव श्री घारड हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती पारशिवनी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचे वतीने उपस्थित असलेले ॲड. भेदरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दि.२८/०८/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, गट ग्राम पंचायत, आमगाव बाभुरवाडा ता. पारशिवनी यांचेकडे माहिती अधिकाराचा अर्ज सादर करुन श्री राजेन्द्र ढोबळे यांना १) कु. आकांक्षा राजेन्द्र ढोबळे २) कु. अपीला राजेन्द्र ढोबळे ३) शंतनु राजेन्द्र ढोबळे अशी तीन अपत्य असुन त्यांची जन्म तारीख व जन्म दाखला मिळण्याची माहिती मागितलेली आहे. तथापी श्री राजेन्द्र ढोबळे यांना तीन अपत्ये असल्याबाबतचा कोणताही पुरावा किंवा माहिती विहीत मुदतीत प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २४/११/२०१० रोजी संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती पारशिवनी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही अपीलार्थीस माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्राम पंचायत आमगाव श्री घारड यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२८/०८/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.०३/०९/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्यास दि.२९/०९/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आणि त्यामध्ये असे नमुद केले की, ग्राम पंचायत रेकॉर्ड नुसार आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जन्मनोंद ग्राम पंचायत रेकॉर्ड मध्ये उपलब्ध नाही. आणि जन्मनोंद अनु उपलब्धता प्रमाणपत्र अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले. सदरचे पत्र अपीलार्थीच्या पत्नीने स्विकृत केले आहे त्यबाबतची पोच देखील जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविली. परंतू सदरचे पत्र अपीलार्थीस मिळाले नसल्याचे अपीलार्थीच्या वकीलांनी सांगितले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांचे मार्फत सदर पत्राची एक ज्यादा प्रत पुन्हा अपीलकर्त्यास आयोगापुढे उपलब्ध करुन देण्यात आली.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी श्रीमती तेलंग यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा प्रथम अपीलाचा निर्णय दि.१६/१२/२०१० रोजी देण्यात आला त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास जन्मनोंद अनु उपलब्धता प्रमाणपत्र दिलेले आहे. तसेच अपीलकर्ता यांनी ग्राम पंचायतीला जन्माचे दाखले पुरवावे जेणे करुन त्यांना मुलांचे जन्माचे प्रमाणपत्र उपलब्ध करुन देता येईल असा निर्णय दिला असल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले.

५. अपीलकर्ता यांचे वकील आणि जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जन्माची नोंद ग्रामपंचायत रेकॉर्डला उपलब्ध नसल्यामुळे जन्मनोंद अनु-उपलब्धता प्रमाणपत्र जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिले आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५७६/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री गुलाबराव तुकाराम बेलेकर (मय्यत)<br>तर्फे युवराज गुलाबराव बेलेकर<br>प्लॉट नं. ५३, मिरे ले आऊट (बापू नगरजवळ) उमरेड रोड, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भूसंपादन<br>कान्होली नाला प्रकल्प नागपूर<br>जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी<br>कान्होली नाला प्रकल्प नागपूर<br>जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २७/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०५/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१६/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २७/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा अव्वल कारकून श्री के. पी. धाबर्डे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०४/०८/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, कार्यालय विशेष भूसंपादन अधिकारी कान्होली नाला प्रकल्प नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर

करुन कोलार प्रकल्पा अंतर्गत मौजा उमरी (भ) येथील स. नं. ३४३/४ ची वेस्टवेअर मध्ये घेतलेली जमिन संपादित झालेली असून मुळ क्षेत्रफळातून कमी न करण्याबाबत माहिती मागितली आहे. तसेच सर्व्हे नं. ३४१/२ ची जमिन मुख्य कालव्या करीता कितीवेळा व किती आराजी संपादित केली त्याचा मोबदला किती दिला याबाबत देखील माहिती मागितली होती तथापी अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.२४/०१/२०११ रोजी प्रथम अपील विशेष भुसंपादन अधिकारी कान्होलीनाला प्रकल्प यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन श्री के. पी. धाबर्डे हे हजर आहेत तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे देखील त्यांनाच प्राधिकृत केले आहे.

जनमाहिती अधिकारी श्री धाबर्डे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.०४/०८/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही तालुका निरिक्षक भूमि अभिलेख सावनेर यांचेशी संबंधित असल्यामुळे तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी दि.२९/१०/२०१० रोजी पत्र लिहून अपीलकर्त्याचे सर्वे नं. ३४३/४ संपादित क्षेत्र ०.६५.५६ हे. आर. यांच्या कमीजास्त पत्रकाची प्रत या कार्यालयास सादर करावी असे कळविले आणि त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. सदरचे पत्र अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे सुनावणीचेवेळी त्यांनी मान्य केले. त्यानुसार अपीलकर्ता यांनी तालुका भुमि अभिलेख सावनेर यांच्या कार्यालयाकडे संपर्क केला त्यावेळी तालुका भुमि अभिलेख यांनी त्यांच्याकडील दि.११/०३/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस राजस्व मामला क्र. ४२/अ - ६५/७५-७६ ची मौजा उमरी प्रकल्पात घेतलेल्या जागे बाबत त्यावेळच्या तयार केलेल्या नकाशावरुन सर्व्हे नं. ३४३/४ चे कमी/जास्त पत्रक तयार करुन त्यांच्याकडून पाठविले. मात्र अद्यापही महसूल विभागाच्या रेकॉर्डवर याची नोंद घेण्यात आली नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

४. उपअधिक्षक भूमि अभिलेख सावनेर यांचेकडून प्राप्त झालेल्या दि.११/०३/२०११ च्या पत्राची प्रत अपीलार्थीने जनमाहिती अधिकारी यांचेकडे आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. त्या पत्राच्या आधारे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या जमिनीच्या क्षेत्रावर योग्य ती नोंद घेण्यासाठीची कार्यवाही करण्या संदर्भात

तहसिलदार सावनेर यांचेकडे आणि उप अधिक्षक भूमि अभिलेख सावनेर यांचेकडे कळविणे योग्य होईल. त्याचप्रमाणे अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून दि.३१/०१/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस सर्व्हे नं. ३४३/४ क्षेत्र ०.१७.४० हे. आर. मोबदला रक्कम २४०१ देण्यात आलेली आहे अशी माहिती देखील अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या शेत सर्व्हे नं. ३४३/४ चे कमी / जास्त पत्रक उप-अधिक्षक भूमि अभिलेख सावनेर यांनी तयार केलेले आहे. त्यानुसार संबंधित तहसिलदार यांनी अपीलकर्त्याच्या शेत सर्व्हे नं. ३४३/४ च्या दस्तऐवजात योग्य ती नोंद करण्याच्या कार्यवाही संदर्भात तहसिलदार सावनेर व उप-अधिक्षक भूमि अभिलेख सावनेर यांना कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या शेत सर्व्हे नं. ३४३/४ मध्ये उप-अधिक्षक भूमि अभिलेख सावनेर यांचेकडील दि.११/०३/२०११ च्या पत्राप्रमाणे महसूली रेकॉर्डमध्ये योग्य ती नोंद करण्याच्या सुचना तहसिलदार सावनेर यांना देण्यात याव्या आणि त्याची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.५७५/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री भिमराव भेमटु टेंभुर्णे<br>विदर्भ हाऊसिंग कॉलनी,<br>C/o, हनुमान मंदिराच्या मागे, जि. प. चौक, गार्डन गेटसमोर, भंडारा<br>ता. जि. भंडारा. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु द्ध**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक<br>आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर<br>माता कचेरी, दिक्षाभूमि जवळ, नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी<br>आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर<br>माता कचेरी, दिक्षाभूमि जवळ, नागपूर. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २७/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ०५/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१६/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २७/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी श्री एन. एम. ठाकरे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा नागपूर श्री डॉ. ए.बी. अमले हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०३/०२/२०११ रोजी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा नागपूर मंडळ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन सन २००१ ते २०१० पर्यंत कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक, सहायक अधिक्षक, अधिक्षक या पदावर आपल्या कार्यालयाने व्हॅलिडीटी न मागता ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली त्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची नावे पदोन्नतीचे वर्ष आणि सध्या कार्यरत कार्यालयाचे नाव प्रमाणित केलेली प्रत. तसेच मा. आयुक्त मागासवर्गीय सेल नगापूर यांनी प्रमाणित केलेली (बिंदुनामावली) रोस्टर रजिस्टर प्रमाणे प्रमाणित केलेली माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दोन कर्मचाऱ्यांची माहिती मिळाली आणि ती अपूर्ण असून इतर माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. ११/०३/२०११ रोजी प्रथम अपील उपसंचालक, आरोग्य सेवा नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी श्री ठाकरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि. ०३/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती तयार करण्यात आली. आणि अपीलार्थीस दि.२३/०२/२०११ ला माहितीचे शुल्क भरणे बाबत कळविण्यात आले. त्यानुसार अपीलकर्त्याने दि.०५/०३/२०११ रोजी माहितीचे शुल्क भरणा केले. आणि अपीलकर्त्यास दि.०५/०३/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक असलेल्या माहितीचे एकूण २६ पेजेस पाठविण्यात आले सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांना फक्त दोनच कर्मचाऱ्यांची माहिती प्राप्त झाली, पदोन्नती दिलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची माहिती त्यांना पाहिजे होती तसेच त्यांना बिंदुनामावलीच्या रजिस्टरची अधिकृत प्रत अद्याप मिळालेली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलार्थीने त्यांच्या माहितीच्या अर्जात validity न मागता पदोन्नती दिलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची माहिती मागितली होती म्हणून त्यांना पदोन्नती दिलेल्या दोन मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची माहिती दिलेली आहे. परंतू अपीलकर्त्याला पदोन्नती दिलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची माहिती पाहिजे आहे आणि ती माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे ती अपीलार्थीस देण्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे मान्य केले.

तसेच अपीलकर्त्यास मा. आयुक्त यांचेकडून बिंदुनामावलीची प्रमाणित केलेली प्रत अपीलार्थीस देण्यात आलेली आहे. तथापी बिंदु नामावलीच्या रजिस्टरमध्ये पान क्र. नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे. मात्र बिंदुनामावलीच्या बाबत जशी माहिती उपलब्ध आहे तीच माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि.०५/०३/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र अपीलार्थीस पदोन्नती दिलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची माहिती पाहिजे आहे म्हणून सदरची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी पदोन्नती दिलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची यादी विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५८४/नाग/२०११</u>**

१. श्री मारोती गणपत वाघमारे - **अपीलकर्ता**
ह. मु. बुध्दभूमी गडचांदुर
ता. कोरपना जि. चंद्रपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी - **उत्तरवादी**
राजुरा.
ता. राजुरा जि. चंद्रपूर.

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय राजुरा
ता. राजुरा जि. चंद्रपूर.

**(आदेश पारित दिनांक २८/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार श्रीमती वंदना वसंत सवरंगपते हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री एन. ऐ. राऊत हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे आज आयोगापुढील सुनावणीस गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार, राजुरा श्रीमती वंदना सवरंगपते ह्या

उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. १०/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे  प्राप्त झाला नाही. मात्र अपीलार्थीने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल केल्यानंतर सदरची बाब त्यांच्या निदर्शनास आली म्हणून त्यांनी अपीलकर्त्याच्या दि.१०/१२/२०१० च्या माहितीच्या अर्जाचा शोध त्यांच्या कार्यालयात घेतला परंतू सदर अर्ज हा आढळून आला नाही. तसेच सदरचा माहितीचा अर्ज प्राप्त झाल्याची नोंद त्यांच्या आवक नोंदवहीत आढळून आली नाही म्हणून दि.१०/१२/२०१० च्या माहिती अर्जाप्रमाणे कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. परंतू अपीलार्थीचा दि.३०/११/२००९ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले त्या अर्जात देखील अपीलार्थीने रॉकेल परवाना क्र.३/९० ची माहिती मागितली होती. सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. आणि सदर माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्याची पोच देखील त्यांनी आयोगापुढे दाखविली. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी राजुरा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.०९/०३/२०११ रोजी घेण्यात आली त्यावेळी अपीलकर्ता हे हजर होते. आणि संबंधितांचे म्हणणे ऐकून घेऊन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२१/०३/२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला आहे आणि त्यामध्ये जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार राजुरा यांनी अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती ३ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी असे नमुद केले असल्याचे श्री राऊत यांनी सांगितले.

३. प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी अपीलार्थीस दि.२१/०३/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीचा  रॉकेलचा परवाना क्र.३/९० ची आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी आयोगापुढे सांगितले. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याची पोच त्यांनी आयोगापुढे दाखविली.

४. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दि.१०/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नव्हता मात्र अपीलार्थीचा दि.३०/११/२००९ चा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता म्हणून दि.३०/११/२००९ च्या अर्जाची माहिती अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते.

त्याचप्रमाणे प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर देखील अपीलार्थीस दि.२१/०३/२०११ च्या पत्रान्वये पुन्हा आवश्यक ती माहिती जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५८५/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मारोती गणपत वाघमारे<br>ह. मु. बुध्दभूमी गडचांदुर<br>ता. कोरपना जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>राजुरा.<br>ता. राजुरा जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय राजुरा<br>ता. राजुरा जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २८/०७/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार श्रीमती वंदना वसंत सवरंगपते हजर आहेत. प्रथम अपीलीय तथा उपविभागीय अधिकारी एन. ऐ. राऊत हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे आज आयोगापुढील सुनावणीस गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार, राजुरा श्रीमती वंदना सौरंगपते ह्या

सुनावणीस उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.१२/०८/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरचा अर्ज संबंधित लिपीक श्री जे. एस. मेश्राम यांचेकडे देण्यात आला होता. अपीलार्थीने माहितीच्या अर्जात माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले असल्यामुळे ते तहसिल कार्यालयात दि. १३/०८/२०१० रोजी प्रत्यक्ष हजर झाले. त्यांना श्री मेश्राम यांनी टोच नकाशाची प्रत, ७/१२ च्या आदेशाची प्रत आणि पाहणी पत्रक इत्यादींच्या छांयाकीत प्रती उपलब्ध करुन दिल्या. सदर प्रती अपीलार्थीस प्राप्त झाल्यानंतर त्यांनी पोच देण्यास नकार दिला आणि त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी राजुरा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.११/११/२०१० रोजी घेण्यात आली. आणि जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस १० दिवसांचे आत आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपीलाच्या निर्णयात आदेश दिले. त्यांनतर प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी अपीलार्थीस दि.१७/११/२०१० ला व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र अपीलार्थीने सही करण्यास नकार दिला याबाबत संबंधित लिपीकाने घेतलेली लेखी नोंद त्यांनी आयोगापुढे दाखविली.

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी राजुरा यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीस प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू अपीलकर्त्याने सही करण्यास नकार दिलेला दिसून येतो म्हणून अपीलार्थीस पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी सदर माहिती ही रजिस्टर्ड पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

PTO

# **आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे पुन्हा रजिस्टर्ड पोस्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.५८६/नाग/२०११**

१. श्री आर. डी. डहाट - **अपीलकर्ता**
द्वारा- श्री जी. ए. बन्सोड, ६५ विवेकानंद नगर, साई मंदीर मागे, वर्धा रोड,
ता. जि. नागपूर-१५.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर.

३. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक - **उत्तरवादी**
माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर.

**(आदेश पारित दिनांक २९/०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक श्रीमती संध्या पतंगे कार्यालयीन अधिक्षक, (शिक्षण विभाग) नागपूर हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद नागपूर श्री बी. एच. पाटील हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०४/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन दि. ३१/०८/२००६ पासून

सह शिक्षक पदावरुन निवृत्त होवून मला सेवानिवृत्ती वेतन तसेच पूर्वलक्ष्मीप्रभावाने थकीत वेतन आजपर्यंत मिळालेले नाही महाराष्ट्र शासन आदेशानुसार सेवानिवृत्ती वेतन मिळण्यासाठी आपण केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती तातडीने देण्यात यावी अशी माहिती त्यांनी मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२८/०२/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध झाली मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असल्याचे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी श्रीमती पतंगे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०४/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने सदरच्या माहिती अर्जात त्यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणाच्या संदर्भात शासन निर्णया नुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली आहे परंतू शासनाच्या निश्चितपणे कोणत्या आदेशावरील कार्यवाहीची माहिती त्यांना पाहिजे आहे याबाबत बोध झाला नाही म्हणून अपीलकर्त्यास दि.२८/०२/२०११ रोजी पत्र पाठवून व्यक्तीशः कार्यालयात हजर राहणेबाबत कळविण्यात आले होते. तसेच अपीलार्थी हे सदर कार्यालयात हजर झाल्यास त्यांना कार्यालयातील पाहिजे असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असेही त्या पत्रामध्ये नमुद केले आहे. मात्र अपीलार्थी हे त्यांच्या कार्यालयात हजर झाले नाही. आणि निश्चित स्वरुपात त्यांना कोणती माहिती पाहिजे आहे याचे स्पष्टीकरणही त्यांनी सादर केले नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दि.०४/०३/२०११ रोजी अपीलकर्त्याचे प्रथम अपील दाखल झाले त्यानुसार त्यांनी जनमाहिती अधिकारी यांना अपीलार्थीस ३ दिवसात माहिती पाठविण्याचे आदेश दिले. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा दि.१५/०५/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस त्यांच्या सेवानिवृत्तीच्या प्रकरणाबाबत लोक आयुक्त मुंबई यांचेकडे अंतिम सुनावणीसाठी शासन स्तरावर कार्यवाही झालेली आहे परंतू या कार्यालयास निर्देश प्राप्त झाले नाही असे कळविले. आणि सदर पत्र अपीलार्थीस पोस्टाद्वारे पाठविण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तथापी पुन्हा आज

आयोगासमोर अपीलार्थीस सदर पत्राची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी प्राप्त करुन दिली. मात्र प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणाबाबत शिक्षणाधिकारी कार्यालयाने शासनाशी किंवा लोक आयुक्तांशी जो पत्र व्यवहार केला आहे त्याची माहिती त्यांना पाहिजे आहे त्यावर जनमाहिती अधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीस त्यांच्या कार्यालयातील त्यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणाबाबतची संपूर्ण धारिका निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. आणि त्यातील पाहिजे असलेली माहिती अपीलकर्त्यास पुरविता येईल. म्हणून प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून त्यांच्या सेवा निवृत्तीच्या प्रकरणा संदर्भात धारिकेचे अवलोकन करुन घेऊन त्यातील त्यांना पाहिजे असलेल्या माहितीच्या प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकर्त्याच्या सेवानिवृत्तीच्या प्रकरणाच्या धारिकेचे निरिक्षण करुन घेण्यासाठी तारीख व वेळ त्यांना लेखी कळवावी. त्यानुसार अपीलार्थीने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून धारिकेचे निरिक्षण करुन घ्यावे आणि निरिक्षणानंतर अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

PTO

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६००/नाग/२०११</u>**

१. श्री अरुण नागोराव कुंभारे - **अपीलकर्ता**
तुकाराम वार्ड, कुंरजेकर ले सिंदी मेघे
ता. जि. वर्धा.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (आ) - **उत्तरवादी**
पंचायत समिती वर्धा
ता. जि. वर्धा.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव - **उत्तरवादी**
ग्राम पंचायत सिंदी मेघे
ता. जि. वर्धा.

**(आदेश पारित दिनांक ३० /०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा ग्राम सेवक, ग्राम पंचायत श्री एच. व्ही. रामटेके हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य पर्यवेक्षक श्री प्रल्हाद वानखेडे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२०/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत सिंदी मेघे ता. जि. वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री भागवत उभाड, धोटे, शेंडे यांनी केलेल्या अतिक्रमणाबाबत आणि इतर मुद्यांबाबत १ ते ८ मुद्यांवर माहिती मागितली होती.

परंतू त्यांना ३० दिवसात कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी विस्तार अधिकारी, पंचायत समिती वर्धा यांचेकडे दि.०८/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीला नंतरही त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीस विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत सिंदी मेघे वर्धा श्री रामटेके हजर आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२०/०५/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. मात्र त्यावेळी जनमाहिती अधिकारी तथा सचिव म्हणून श्री सी.के. सहारे हे कार्यरत होते त्यांनी ३० दिवसांचे आत अपीलार्थीस माहिती प्राप्त करुन दिलेली दिसून येत नाही. त्यानंतर विद्यमान जनमाहिती अधिकारी श्री रामटेके हे दि.०१/११/२०१० पासून श्री सहारे यांच्या जागेवर रुजू झाले असल्याचे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांनी तयार केल्याचे सुनावणीचेवेळी त्यांनी सांगितले. आणि अपीलकर्त्यास आयोगामोर सदरची माहिती उपलब्ध करुन दिली. सदर माहिती अपीलार्थीने आयोगासमोर स्विकृत केली. सदर माहिती ३० दिवसांचे मुदतीत अपीलकर्त्यास दिलेली नाही या विलंबास तात्कालीन जनमाहिती अधिकारी श्री सी. के. सहारे हे जबाबदार दिसून येतात. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये त्यांचेविरुध्द रु.१०,०००/- ची शास्ती का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

PTO

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा सचिव श्री सी. के. सहारे यांनी ३० दिवसांचे आत अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. म्हणून अपीलार्थीस माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला दिसून येतो. सदर विलंबास तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु. १०,०००/- ची शास्ती का लादण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा.

२. विद्यमान जनमाहिती अधिकारी श्री रामटेके यांनी सदर निर्णयाची एक प्रत तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री सी. के. सहारे यांचेकडे रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तीशः त्यांना उपलब्ध करुन द्यावी.

३. सदर निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती वर्धा यांचेकडे योग्य तया कार्यवाहीसाठी पाठवावी.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.५९९/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री लक्षमय्या राजम नागुला<br>भोई मोहल्ला वार्ड. नं. ५ (बेस्तागुडम) कोत्तागुडेम, सिरोंचा<br>पो ता. सिरोंचा जि. गडचिरोली-४४२ ५०४. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२, नागपूर विभाग नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ३० /०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी श्री अनिल काळे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी श्री एस. व्ही. गाडे हजर आहेत.

२. आज आयोगाच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र आज सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी श्री काळे हे हजर

आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. ०१/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने भोई मोहल्ला (बेस्तागुळम) वार्ड नं. ५ कोत्तागुडम सिरोंचा जि. गडचिरोली या गावातील रहिवास्यांचे जात पडताळणी करीता सादर केलेल्या प्रस्तावांचे व समितीमार्फत केलेल्या कार्यवाहीचे दस्तऐवज मागितले होते. अपीलार्थीच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास रु.१३२/- माहितीचे शुल्क भरणेबाबत कळविण्यात आले त्यानुसार माहितीचे शुल्क रु. १३२/- भरणा केले आणि अपीलार्थीस दि.३०/११/२०१० च्या पत्रान्वये रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती पाठविण्यात आली. सदरची माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्या बाबतचा पुरावा जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविला. तथापी त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे दाखल केले. त्यांनी सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेतली मात्र अपीलकर्ता हे सदर सुनावणीस गैरहजर राहिले. त्यावेळी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस पाठविल्यामुळे सदरचे प्रथम अपील खारीज करण्यात आले असे श्री गाडे यांनी आयोगापुढे सांगितले.

३. आज आयोगापुढे सुनावणीचेवेळी जनमाहिती अधिकारी श्री अशोक काळे व प्रथम अपीलीय अधिकारी श्री गाडे यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, यापूर्वी देखील अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे अशाच प्रकारच्या माहितीचे सुमारे ११ अपीले दाखल केलेली आहेत. ती सर्व अपीले आयोगाने खारीज केली आहेत. त्या अपीलांच्या निर्णयात अपीलकर्ता जी माहिती मागत आहे त्यात कोणतेही व्यापक जनहित नसल्यामुळे व त्यांचे वैयक्तिक हिताकरीता ते मागत असतात असे नमुद करुन त्यांची सर्व अपीले यापूर्वी खारीज करण्यात आली आहेत म्हणून हे अपील देखील खारीज करण्यात यावे असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिाकरी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. ३०/११/२०१० च्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१.	अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६०१/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री प्रभाकर रामराव वराडे<br>मनोरम विद्यानगर, टी. बी. टोली, गोंदिया<br>ता. जि. गोंदिया. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता<br>जलप्रदाय विभाग महानगर पालिका नागपूर<br>भोले पेट्रोलपंप जवळ, धरमपेठ नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता<br>नागपूर महानगर पालिका, जलप्रदाय विभाग, नेहरु नगर झोन क्र.५, नागपूर<br>नेहरु नगर, नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ३० /०७/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०/०७/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी श्री प्रदीप शंकरराव राजगिरे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे कनिष्ठ लिपीक श्री जे. एन. गायकवाड हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.१८/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता नागपूर महानगर पालिका जलप्रदाय विभाग नेहरु नगर

झोन क्र.५ नागपूर यांचेकडे अपीलार्थीने नळ बिल दुरुस्तीबाबत महानगर पालिकेकडे दि.०९/०२/२००९, दि.०१/०९/२००९, दि.१५/०२/२०१० आणि दि.२४/१२/२०१० रोजी अर्ज दिले होते. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. परंतू त्यांना ३० दिवसांचे आत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्यांना दि.१६/०३/२०११ रोजी माहिती प्राप्त झाली. परंतू ३० दिवसांचे मुदतीत त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचेविरुध्द कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता श्री प्रदीप शंकरराव राजगीरे जलप्रदाय विभाग नागपूर महानगर पालिका यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२८/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीस दि.११/०३/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती त्यांनी उपलब्ध करुन दिलेली असून सदर माहिती दि.१६/०३/२०११ रोजी अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच कार्यबाहुल्यामुळे त्यांना ३० दिवसांचे मुदतीत अपीलकर्त्यास माहिती देता आली नाही म्हणून माहिती देण्यास विलंब झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या दि.२८/०१/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर दि. ११/०३/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. आणि सदरची माहिती अपीलार्थीस दि.१६/०३/२०११ रोजी प्राप्त झालेली आहे म्हणून ३० दिवसांचे मुदतीत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नाही. विलंबा बद्यल त्यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, कार्यबाहुल्यामुळे ३० दिवसांचे मुदतीत ते अपीलार्थीस माहिती देवू शकले नाही तथापी जनमाहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता श्री प्रदीप शंकरराव राजगीरे यांनी अपीलार्थीच्या दि.२८/०१/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसात कोणतीही माहिती दिली नाही त्यानंतर दि.११/०३/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती विलंबाने पाठविलेली दिसून येते म्हणून झालेल्या विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. त्यामुळे त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु.१०,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.

३. सदरच्या शास्तीची रक्कम जनमाहिती अधिकारी श्री राजगीरे यांचे दरमहाचे वेतनातून कपात करुन ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " मध्ये जमा करावी.

४. सदरच्या शास्तीची वसूली कार्यकारी अभियंता, जलप्रदाय विभाग महानगर पालिका नागपूर यांनी करावयाची आहे.

५. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**